cmyk

दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१४० | रविवार दि.०९ ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### राज्यात १३ ऑगस्टपासून पावसाचा जोर पुन्हा वाढणार

मुंबई: गेल्या काही दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतली होती. मात्र, आता हवामानात पुन्हा बदल होण्याचे संकेत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढू शकतो. १३ ते २० ऑगस्ट या काळात विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि कोकणात सरासरीपेक्षा जास्त पाऊस होण्याची शक्यता आहे. तसेच २० ते २७ ऑगस्ट दरम्यान राज्यातील विविध भागांमध्ये पाऊस सुरूच राहण्याची शक्यता आहे, असे ज्येष्ठ हवामानशास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी सांगितले आहे. हवामान विभागाने हवामानासंबंधित एक महत्त्वपूर्ण अंदाज जाहीर केला आहे. येत्या २४ तासांत बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याचा इशारा दिला आहे. तसेच चालू महिन्यात महाराष्ट्रात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

### शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे खासदारही मोदींना भेटणार?

दिल्ली: नुकतेच एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या सर्व खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यात ठाकरे गटातून शिंदे गटात उडी मारलेल्या खासदारांचा देखील समावेश होता. यावेळी या खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घाबरू नका मी तुमच्या पाठीशी असल्याचे सांगितले होते. आता राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार देखील पंतप्रधान मोदींच्या भेटीला जाणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे सर्व खासदार पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेटणार आहेत. त्यामुळे राजकीय वर्तुळात एक वेगळीच चर्चा सुरू झाली आहे. या सर्व खासदारांकडून पंतप्रधानांना भेटण्याची वेळ मागण्यात आली आहे. ही भेट पुढील आठवड्यात होण्याची शक्यता आहे. एका खासदाराने ही फक्त सदिच्छा भेट असणार आहे असे सांगितले. मात्र शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेण्याने राज्यात नवीन राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता जाणकार व्यक्त करत आहेत.

### झारखंडमध्ये सहा विद्यार्थ्यांचे उपोषण सुरूच

रांची : झारखंड पीएससी-एसएससी परीक्षांमधील अनियकारी शिष्टमंडळ यांच्यात झालेली चर्चेची दुसरी फेरी अनिर्णित राहिली. ही बैठक एक तास चालली. यापूर्वी, शुक्रवारी रात्री सरकारी शिष्टमंडळाने विद्यार्थ्यांशी संवाद साधला होता, परंतु या बैठकीतूनही काही निष्पन्न झाले नाही. दरम्यान, सरकारने विद्यार्थ्यांना त्यांच्या सूचना सादर करण्यासाठी एक ईमेल आयडी आणि एक फीडबॅक नंबर जारी केला आहे. मंत्री सुदिब्य कुमार सोनू म्हणाले, ''आम्ही विविध विद्यार्थी गट आणि हितधारकांना भेटू. सर्व सूचनांचा विचार करून निर्णय घेतला जाईल.'' झारखंड पीएससी रद्द करण्याच्या मागणीसाठी सहा विद्यार्थी उपोषणावर आहेत. विद्यार्थ्यांनी १० ऑगस्ट रोजी विधानसभेला घेराव घालण्याची घोषणा केली आहे. शनिवारी सकाळी, एबीव्हीपीचे कार्यकर्ते मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाला घेराव घालण्यासाठी निघाले होते, परंतु पोलिसांनी त्यांना रोखले. दरम्यान, मंत्री सुदिव्य कुमार सोनू म्हणाले, ''आम्ही सौहार्दपूर्ण वातावरणात विद्यार्थ्यांना भेटलो. आम्ही त्यांच्या मागण्या समजून घेतल्या. सरकार त्यांच्या मागण्यांवर गांभीर्याने विचार करण्यास कटिबद्ध आहे.'' या बैठकीत सरकारच्या वतीने मंत्री चमरा लिंडा, सुदिव्य सोनू, दीपिका पांडे सिंग आणि संजय यादव उपस्थित होते.

# कारखानदारांकडून शेतकऱ्यांची दिशाभूल!

## थकीत ऊसबिल आणि रिकव्हरी चोरीप्रश्नी राजू शेट्टी आक्रमक; थेट साखर आयुक्तांसोबत महत्त्वाची बैठक

पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील साखर कारखान्यांनी थकीत एफआरपीची चुकीची आकडेवारी साखर आयुक्त कार्यालयाला सादर केली असून, अशा कारखान्यांवर तातडीने कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते माजी खासदार राजू शेट्टी यांनी केली आहे. थकीत ऊसबिलासह शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी राजू शेट्टी यांनी साखर आयुक्त कार्यालयात राज्याचे साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या बैठकीत राजू शेट्टी यांनी साखर उद्योगातील गैरव्यवहार आणि शेतकऱ्यांच्या लुटीकडे प्रशासनाचे लक्ष वेधत अनेक महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले.**

राज्यातील कारखान्यांनी सादर केलेली थकीत एफआरपीची आकडेवारी आणि प्रत्यक्ष स्थिती यामध्ये मोठी तफावत आहे. कारखानदार दिशाभूल करत असून आयुक्त कार्यालयाने याची गंभीर दखल घेऊन संबंधित कारखान्यांवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी शेट्टी यांनी केली. तसेच, राज्य सरकारच्या दोन किंवा तीन टप्यातील एफआरपीच्या चुकीच्या धोरणामुळे गेल्या तीन वर्षांत ज्या कारखान्यांनी



दोन ते तीन टप्प्यांत एफआरपी दिली, त्यांनी विलंबाच्या कालावधीचे व्याज शेतकऱ्यांच्या खात्यावर तातडीने जमा करावे, असेही त्यांनी ठामपणे सांगितले. उसाचे वजन आणि रिकव्हरी (उतारा) यामध्ये होणारी चोरी हा राज्यातील शेतकऱ्यांसाठी मोठा चिंतेचा विषय बनला आहे. यावर कायमस्वरूपी तोडगा म्हणून सर्व वजनकाटे तातडीने 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाईन जोडले जावेत, जेणेकरून काटामारीला आळा बसेल. यासोबतच, मराठवाड्यातील कारखान्यांमध्ये रिकव्हरी चोरीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले असून, ते रोखण्यासाठी साखर आयुक्त कार्यालयाने तिथे स्वतंत्र तपासणी यंत्रणा ▶▶ पान २ वर

## दुकानदार, किराणा व्यावसायिकांना युपीआय पेमेंटवर चार्जेस?

● सरकारकडून आली मोठी अपडेट



दिल्ली । वृत्तसंस्था

गेल्या काही दिवसांपासून सरकारच्या नव्या नियमाची जोरदार चर्चा सुरू आहे. सरकारने आता व्यावसायिकांच्या युपीआय पेमेंटवर चार्जेस लावण्याचा निर्णय घेतला आहे. त्यालाच मर्चंट डिस्काऊंट रेट असे म्हटले जात आहे. जर हे चार्जेस लागू झाले तर त्याचा मोठा परिणाम हा ऑनलाईन पेमेंटवर होऊ शकतो.

अनेक लोकांनी या निर्णयाचा अप्रत्यक्ष परिणाम हा सामान्य युपीआय युजर्सवर देखील पडण्याची शक्यता असल्याचा दावा केला आहे. मात्र अर्थ मंत्री निर्मला सीतारमन यांनी याबाबत मोठी अपडेट दिली आहे. त्यांनी आता हा नियम लागू करण्याचा कोणता विचार नाही. मात्र भविष्यात जरी हे जार्जेस लागू केले तरी त्याचा सामान्य ग्राहकांनावर याचा काही परिणाम होणार नाही असा खुलासा त्यांनी केला. मात्र तरी देखील हे चार्जेस किराणा स्टोअर्स, आईस्क्रीम शॉपी, छोटे दुकानदार, स्वीट मार्ट, हातगाडीधारक किंवा छोटे दुकानदार यांच्यावर परिणाम होणार का असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यांना देखील हे चार्जेस द्यावे लागणार आहेत का? याचे उत्तर अंतर्गत काम करणाऱ्या भारतीय पेमेंट परिषद (पेमेंट काऊन्सील ऑफ इंडिया) ▶▶ पान २ वर

# मी गद्दारांच्या पाठीशी!

## मोदी कुणाला धमकीवजा संदेश देत आहेत? उद्धव ठाकरेंचा थेट सवाल

मुंबई । प्रतिनिधी

**शिवसेनेतील बंडखोर खासदारांनी पंतप्रधानांची भेट घेतली. या भेटीनंतर ''भिऊ नका, मी तुमच्या पाठीशी आहे'', असा संदेश पंतप्रधानांनी दिल्याचा दावा उद्धव ठाकरे यांनी केला. यावरून त्यांनी थेट सवाल केला, ''हे वाक्य नेमके कोणाला सांगितले जात आहे? सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असताना अशा प्रकारचा संदेश देण्यामागे नेमका हेतू काय? कोर्टाला धमकावत आहात का?'' असा सवाल उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला आहे.**

शिवसेना पक्षाच्या प्रलंबित प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असतानाच शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे. जंतरमंतरवर आंदोलन



करणाऱ्या तरुणांना भेटण्यासाठी पंतप्रधानांकडे वेळ नाही, मात्र ''गद्दारांना भेटायला वेळ आहे'', असा आरोप करत उद्धव ठाकरे यांनी मोदींच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पत्रकार परिषदेत बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, गेल्या चार वर्षांपासून शिवसेना पक्षाशी संबंधित प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने आपण त्यावर भाष्य केलेले नाही आणि यापुढेही करणार नाही. संविधानाप्रमाणे न्यायालयाकडून निकाल दिला जाईल, असा पूर्ण विश्वास असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, देशातील सध्याचे राजकीय वातावरण पाहता काही घटनांवर बोलणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. देशातील तरुण आपल्या न्याय्य हक्कांसाठी आंदोलन करत असताना त्यांच्यावर लाठीचार्ज, अश्रुधुराचा वापर आणि इतर प्रकारे कारवाई करण्यात आली. मात्र, या तरुणांशी संवाद साधण्यासाठी पंतप्रधान किंवा गृहमंत्र्यांकडे वेळ नसल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला. यावेळी उद्धव ठाकरे यांनी भाजपच्या कथित 'वॉशिंग मशीन'च्या राजकारणावरही टीका केली. विरोधी पक्षातील नेते सत्ताधारी पक्षात गेल्यानंतर त्यांच्यावरील आरोप आणि कारवाया थांबतात, असा आरोप त्यांनी केला. ''कितीही गुन्हे करा, वॉशिंग मशीनमध्ये ▶▶ पान २ वर

## मनोज जरांगेंनंतर आता नरेंद्र पाटीलही आक्रमक

बीड । प्रतिनिधी



राज्यात उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणानंतर कुणबी मराठा समाजातील बांधवांना जात प्रमाणपत्र मिळाले, ओबीसीमधून हे जातीचे प्रमाणपत्र मिळाल्याने मराठा बांधवांनीही आनंद व्यक्त केलाय. मात्र, आता जात प्रमाणपत्र देताना किंवा जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र दिले जात नसल्याने वाद उद्भवला आहे. तर, काहींची जात प्रमाणपत्रही रद्द करण्यात येत असल्याने मनोज जरांगे पाटील यांनी थेट सरकारला धारेवर धरलंय. त्यातच, आता आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनीही जात प्रमाणपत्र देताना काही अधिकारी खोडसाळपणा करतात, काही काही अधिकारी अति हुशार असतात, असे म्हणत प्रशासनाला लक्ष्य केलंय.

जात प्रमाणपत्र देताना काही अधिकारी जाणीवपूर्वक खोडसाळपणा करतात, असा गंभीर आरोप नरेंद्र पाटील यांनी केला आहे. महामंडळातील अधिकाऱ्यांकडून लावण्यात ▶▶ पान २ वर

## अमेरिकेची नवी खेळी; भारतावर १०० टक्के टॅरिफ?

### रशियावर निर्बंध लागू करणारे विधेयक सिनेटमध्ये मंजूर




न्युयॉर्क । वृत्तसंस्था

**अमेरिकेच्या संसदेचे (काँग्रेस) वरिष्ठ सभागृह सिनेटने भारतासह पाच प्रमुख देशांवर १०० टक्क्यांपर्यंत आयात शुल्क (टॅरिफ) लागू करु शकणारे विधेयक मंजूर केले आहे. याचा सर्वाधिक फटका भारत, चीन सारख्या देशांना बसू शकतो. जे सध्या रशियाकडून तेल आणि गॅस खरेदी करतात.**

या विधेयकामुळे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना रशियाकडून तेल आणि गॅस खरेदी करणाऱ्या जगातील पाच प्रमुख देशांवर १०० टक्के आयात शुल्क लागू करण्याचा अधिकार मिळू शकतो. दोन्ही पक्षांच्या सहमतीने मांडण्यात आलेले हे विधेयक अमेरिकन सिनेटने ८६-११ अशा मतांनी मंजूर केले. सध्या चीन, भारत, अझरबैजान, हंगेरी आणि स्लोव्हाकिया हे सध्या रशियाच्या तेल आणि गॅसचे प्रमुख पाच खरेदीदार देश आहेत. त्यामुळे अमेरिकेच्या शुल्काबाबतच्या या निर्णयाचा थेट फटका या देशांना बसण्याची शक्यता आहे. या विधेयकाच्या माध्मयातून रशिया आणि इराणवर आर्थिक दबाव वाढवणे तसेच रशियासोबत मोठ्या प्रमाणात ऊर्जा व्यापार करणाऱ्या देशांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न असल्याचे जाणकार ▶▶ पान २ वर

**“ अमेरिकेच्या विधेयकामुळे असे होतील परिणाम**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प १०० टक्के आयात लागू करु शकतील. जे देश रशियाकडून तेल आणि गॅस खरेदी करतात; त्यांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न होऊ शकतो. याचा भारतासह चीन, हंगेरी, अझरबैजान, हंगेरी, स्लोव्हाकिया आदी देशांना फटका बसणार.

## नीटचे प्रश्न फोडण्यासाठी फिफा वर्ल्डकप नावाचा वापर!

### पी.व्ही.कुलकर्णीची गोपनीयतेचा भंग करीत पेपरफुटीत मोठी भूमिका

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

देशभरात गदारोळ निर्माण करणाऱ्या नीट-यूजी २०२६ पेपरफुटीच्या प्रकरणात केंद्रीय गुन्हे अन्वेषण (सीबीआय) विभागाच्या आरोपपत्रातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. राष्ट्रीय परीक्षा संस्थेचा (एनटीए) रसायनशास्त्र तज्ज्ञ पी. व्ही. कुलकर्णी यानेच पेपरफुटीत सर्वात मोठी भूमिका पार पाडल्याचा ठपका सीबीआयने ठेवला आहे.

पेपरफुटीची तयारी सहा महिने आधी ऑक्टोबर २०२५ पासूनच सुरू होती. विद्यार्थ्यांपर्यंत प्रश्न पोहोचविण्यासाठी स्पेशल




क्लास, फिफा वर्ल्डकप अशा विशेष नावांचे खास व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप बनविण्यात आले होते. या प्रश्नांच्या बदल्यात रोख रकमेसोबतच घड्याळही भेट म्हणून घेण्यात आले, असे उल्लेख सीबीआयने आरोपपत्रात केल्याची माहिती पुढे आली आहे. सीबीआयच्या तपासातून समोर आले आहे की, एनटीएची केमिस्ट्री एक्स्पर्ट पी. व्ही. कुलकर्णी याची पेपरफुटीत मोठी भूमिका ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.०८ ऑगस्ट २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: ३३.५० क्विंटल** | | |
| २,४०० | २,७०० | २,६०३ |
| **ज्वारी/हायब्रिड : ४१.५० क्विंटल** | | |
| २,४८० | ४,३०० | ३,२५३ |
| **मका/लोकल: ३.५० क्विंटल** | | |
| २,१८० | २,१८० | २,१८० |
| **तूर : १.०० क्विंटल** | | |
| ३,८६० | ४,००० | ३,९३० |
| **उडीद : २.०० क्विंटल** | | |
| ५,००० | ५,००० | ५,००० |
| **बाजरी: ६.५० क्विंटल** | | |
| २,५८० | २,८९० | २,७५६ |
| **मुग: ४१.५० क्विंटल** | | |
| ५,८०० | ५,८१२ | ५,८०६ |
| **सोयाबीन: ६.०० क्विंटल** | | |
| ७,००० | ७,००० | ७,००० |
| **हरभरा: ०.५० क्विंटल** | | |
| ६,००० | ६,००० | ६,००० |

# मेटाला ९ हजार कोटींचा दंड ठोठावला

## फेसबुक आणि इन्स्टाग्रामने मानसिक आरोग्याची हानी

नवीदिल्ली । वृतसंस्था

**अमेरिकेतील न्यू मेक्सिको राज्यातील एका न्यायालयाने इन्स्टाग्राम आणि फेसबुकची मूळ कंपनी असलेल्या मेटावर ९४२ दशलक्ष डॉलर्स (अंदाजे ९०३० कोटी रुपये) चा दंड ठोठावला. या प्लॅटफॉर्ममुळे तरुणांच्या मानसिक आरोग्याला हानी पोहोचली, असे न्यायालयाने म्हटले आहे. या दंडापैकी ४२० दशलक्ष डॉलर्स (अंदाजे ३९९३ कोटी रुपये) तरुणांच्या उपचारांवर खर्च केले जातील. उर्वरित रक्कम पुढील पाच वर्षांत जनजागृती, प्रतिबंध आणि तपासणी सेवांवर खर्च केली जाईल.**

पहिल्या टप्प्यात, न्यायालयाने मेटावर ३७५ दशलक्ष डॉलर्सचा दिवाणी दंड ठोठावला. कंपनीला प्लॅटफॉर्मवरील बाल लैंगिक शोषणाबद्दल माहिती असूनही ती माहिती लपवून ठेवली, असे न्यायालयाने म्हटले आहे. दुसऱ्या टप्प्यात, न्यायालयाने मेटावर ५६७ दशलक्ष डॉलर्सचा दंड ठोठावला, ज्यामुळे कंपनीवर ठोठावलेला एकूण दंड ९४२ दशलक्ष डॉलर्स झाला. खटल्यादरम्यान, अभियोक्त्यांनी न्यायाधीशांना मेटासाठी मूलभूत बदल अनिवार्य करण्याची विनंती केली. या बदलांचा उद्देश व्यसन लावणाऱ्या वैशिष्ट्यांवर निर्बंध घालून, वय पडताळणी प्रक्रिया सुधारून, आणि गोपनीयता सेटिंग्ज अधिक कडक करून व डीफॉल्ट गोपनीयता सेटिंग्जवर देखरेख ठेवून बाल लैंगिक शोषण रोखणे हा होता.हा खटला न्यू मेक्सिकोचे अ‍ॅटर्नी जनरल राऊल टॉरेस यांनी दाखल केला होता. आरोप असा होता की मेटाचे इन्स्टाग्राम आणि फेसबुक प्लॅटफॉर्म मुलांसाठी असुरक्षित होते आणि कंपनीने जाणीवपूर्वक या धोक्यांकडे दुर्लक्ष केले. ▶▶ पान २ वर

YouTube | Instagram | facebook

## महंत नामदेव महाराज शास्त्री यांच्यावर अँन्जिओप्लास्टी

बीड । प्रतिनिधी



**श्रीक्षेत्र भगवानगडाचे महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांना अचानकपणे छातीत त्रास जाणवल्यामुळे त्यांच्यावर तातडीने अँन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली आहे. त्यांची प्रकृती आता स्थिर आहे. अहिल्यानगर येथील इंपल्स हॉस्पिटल येथे उपचारांसाठी दाखल करण्यात आले आहेत. न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्यावर डॉ. सुहास हरदास, डॉ. संदीप गाडे आणि डॉ. महेश घुगे यांच्या देखरेखीखाली ते पुढील काही दिवस रुग्णालयात असणार आहेत.**

उपचार दरम्यान भाविक, हितचिंतक यांनी भेटण्यासाठी प्रयत्न किंवा आग्रह धरू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. यासंदर्भात हॉस्पिटल प्रशासन आणि डॉक्टर मंडळी यांना शास्त्रीजींना भेटण्यासाठी संपर्क किंवा ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# आंदोलनाच्या वेळी मौन, आता जेन-झी बद्दल आपुलकी?

जेन झी राष्ट्रविरोधी नाही. ती प्रश्न विचारणारी पिढी आहे. तिला आदेश देण्यापेक्षा समजावून सांगण्याची गरज आहे. तिच्याशी संवाद साधला पाहिजे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी २५ जुलैला मांडलेली ही भूमिका ऐकायला निश्चितच चांगली आहे. लोकशाहीच्या दृष्टीने तर ती आवश्यकच आहे. पण प्रश्न एवढाच आहे की, हे शहाणपण आंदोलनाच्या वेळी कुठे होते?

आज जेन झी ला समजून घेण्याचा सल्ला दिला जातो आहे. पण ज्या जेन झी ने शिक्षणव्यवस्था, परीक्षा, कथित पेपरफुटी, रोजगार आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर प्रश्न उपस्थित केले, त्या तरुणांचा आवाज जेव्हा रस्त्यावर आला, तेव्हा त्याच गांभीर्याने तो ऐकला गेला का? हा प्रश्न सीजेपी च्या आंदोलनामुळे अधिक तीव्र होतो. सीजेपी चे संस्थापक अभिजीत दिपके यांनी भागवतांच्या वक्तव्याचे स्वागत केले; पण त्याच वेळी एक अस्वस्थ करणारा प्रश्नही विचारला जर जेन झी ला राष्ट्रविरोधी समजणे चुकीचे असेल, तर सरकार आणि भाजपनेही आंदोलन करणाऱ्या तरुणांकडे त्याच नजरेने पाहायला हवे. हा प्रश्न साधा आहे.जेन झी चांगली फक्त तेव्हा आहे, जेव्हा ती तुमचे ऐकते? की ती तुमच्यावर प्रश्न उपस्थित करते तेव्हाही चांगलीच आहे कारण लोकशाहीत 'आमचे म्हणणे ऐका' हा अधिकार सत्तेचा जितका आहे, तितकाच 'आमचे म्हणणे ऐका' हा अधिकार विद्यार्थ्यांचाही आहे. सीजेपी चे आंदोलन अचानक निर्माण झाले नाही. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांमधून, परीक्षा व्यवस्थेबद्दलच्या असंतोषातून आणि भवितव्याबाबतच्या चिंतेतून हा आवाज पुढे आला. या तरुणांनी प्रश्न विचारले. रस्त्यावर उतरले. व्यवस्थेला आव्हान दिले. आणि मग राजकारणाच्या नजरा त्यांच्याकडे वळल्या.आता भागवत म्हणतात, तरुणांशी संवाद साधा. नक्कीच साधा पण संवाद म्हणजे केवळ व्यासपीठावरून तरुणांना समजावून सांगणे नव्हे. संवाद म्हणजे आधी त्यांचे ऐकणे. त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देणे. चुका झाल्या असतील तर त्या मान्य करणे. आणि सरकारच्या धोरणांवर प्रश्न विचारणाऱ्या विद्यार्थ्यांना राजकीय चष्म्यातून न पाहणे. जर हेच करायचे असेल, तर भागवतांचा संदेश खरोखर ऐतिहासिक ठरू शकतो. पण जर 'संवाद' म्हणजे जेन झी ला पुन्हा एखाद्या राजकीय विचारसरणीच्या छत्राखाली आणण्याची रणनीती असेल, तर ही पिढी तेही ओळखेल. कारण ही जुनी मतदारपिढी नाही. ही 'का?' विचारणारी पिढी आहे. आरएसएस आणि बीजेपी चे वैचारिक-संघटनात्मक संबंध भारतीय राजकारणात परिचित आहेत. त्यामुळे आरएसएस च्या सर्वोच्च नेतृत्वाकडून जेन झी बद्दल सकारात्मक संदेश येतो, तेव्हा त्यामागील राजकीय संदर्भांवर चर्चा होणे स्वाभाविक आहे. याचा अर्थ हा निश्चितच राजकीय डाव आहे, असा दावा करता येणार नाही. पण प्रश्न विचारता येतो. आणि तो विचारायलाच हवा. भारताच्या तरुण मतदारांमध्ये बदल होत असताना राजकारणाला जेन झी ची आठवण झाली आहे का? आजची तरुण पिढी पारंपरिक राजकीय निष्ठांना फारशी बांधील नाही. ती कोणत्याही पक्षाला कायमस्वरूपी समर्थन देईलच असे नाही. ती सरकारला प्रश्न विचारते. विरोधकांनाही प्रश्न विचारते. मीडियालाही प्रश्न विचारते. आणि गरज पडली तर स्वतःच्या आंदोलनातील नेतृत्वालाही प्रश्न विचारते. म्हणूनच या पिढीला 'आपले' करण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रत्येक राजकीय शक्तीसमोर एकच अडथळा आहे. जेन झी ला फक्त तुमची भाषा नको आहे; तिला तुमची उत्तरदायित्वाची तयारी पाहायची आहे. सगळ्यात मोठा विरोधाभास इथेच आहे.आज जेन झी ला सांगितले जाते, 'तुम्ही राष्ट्रविरोधी नाही.'पण प्रश्न असा आहे की, जेन झी ला हे प्रमाणपत्र कोणी मागितले होते? त्यांनी कोणाकडून वैचारिक मान्यता मागितली होती का? त्यांनी फक्त प्रश्न विचारले. परीक्षेबद्दल. पेपरफुटीबद्दल. रोजगाराबद्दल.शिक्षणाच्या गुणवत्तेबद्दल.फीबद्दल.सरकारी उत्तरदायित्वाबद्दल.मग त्यांच्या प्रश्नांना उत्तर देण्याऐवजी त्यांच्या देशभक्तीची परीक्षा का? प्रश्न विचारणारा विद्यार्थी राष्ट्रविरोधी नसतो; तो लोकशाहीचा सर्वात जिवंत घटक असतो.भागवतांचे वक्तव्य स्वागतार्ह; पण आता कृतीची वेळ भागवतांनी संवादाची भाषा निवडली असेल, तर त्याचे स्वागत झाले पाहिजे.पण आता पुढची पायरीही तितकीच महत्त्वाची आहे.सरकार विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधणार का सीजेपी सारख्या आंदोलनांकडे फक्त राजकीय आंदोलन म्हणून पाहण्याऐवजी त्यामागील प्रश्नांचा स्वतंत्रपणे विचार होणार का? परीक्षा व्यवस्थेबाबत विद्यार्थ्यांच्या मनातील अविश्वास दूर करण्यासाठी पारदर्शक यंत्रणा उभी राहणार का? आणि सर्वात महत्त्वाचे सत्तेला प्रश्न विचारणाऱ्या तरुणाला विरोधक, दिशाभूल झालेला किंवा राष्ट्रविरोधी ठरवण्याची राजकीय सवय बदलणार का? या प्रश्नांची उत्तरे मिळाल्याशिवाय जेन झी शी संवाद' हा केवळ सुंदर राजकीय वाक्प्रचार ठरेल. जेन झी ला जिंकायचे असेल तर आधी तिला समजून घ्या. आज कोणत्याही पक्षाला जेन झी ला दुर्लक्ष करता येणार नाही.पण तिला जिंकण्याचा सर्वात सोपा मार्ग प्रचार नाही.तिला जिंकण्याचा मार्ग आहे. विश्वास.आणि विश्वास निर्माण होतो तो भाषणातून नाही, कृतीतून. तरुणांना सन्मानाने प्रश्न विचारू दिले तर. त्यांच्या आंदोलनांना ऐकले तर. चुका मान्य केल्या तर. आणि सरकारने स्वतःला प्रश्नांच्या पलीकडे समजणे थांबवले तर.म्हणून आजचा प्रश्न मोहन भागवत विरुद्ध जेन झी असा नाही. बीजेपी विरुद्ध जेन झी असाही नाही.प्रश्न त्याहून मोठा आहे. भारतीय राजकारण जेन झी ला मतदार म्हणून पाहणार आहे की नागरिक म्हणून? मतदार म्हणून पाहणार असाल, तर निवडणूक आली की संवाद सुरू होईल.नागरिक म्हणून पाहणार असाल, तर तिचे प्रश्न आजपासून ऐकावे लागतील. कारण जेन झी ला नेते नकोत असे नाही.पण अंधानुकरण करणारे नेते नकोत.तिला विचारधारा नको असेही नाही. पण प्रश्न विचारण्यावर बंदी घालणारी विचारधारा नको. तिला राष्ट्रवाद नको असेही नाही. पण राष्ट्रवादाच्या नावावर प्रश्न विचारण्याचा अधिकार हिरावून घेणारा राष्ट्रवाद नको. आणि म्हणूनच भागवतांचे जेन झी ला समजून घ्या' हे वक्तव्य आता स्वतःच एका कसोटीवर आले आहे.जेन झी ला सर्टिफिकेट देण्याची गरज नाही. तिच्या प्रश्नांची उत्तरे देण्याची गरज आहे. आणि सीजेपी च्या आंदोलनाने कदाचित हाच प्रश्न भारतीय राजकारणासमोर ठेवला आहे. ''आम्ही देशविरोधी आहोत की तुम्हाला प्रश्न विचारणारे नागरिक आहोत?'' या प्रश्नाचे उत्तर भाषणातून मिळणार नाही. ते सत्तेच्या कृतीतूनच द्यावे लागेल. कारण आता जेन झी सर्टिफिकेट स्वीकारणार नाही. ती सर्टिफिकेट देणाऱ्यालाच प्रश्न विचारणार आहे.

# १०० ट्रक भांडे संच कामगारा अधिकाऱ्यांनी विकल्याचा आ.लोणीकरांचा आरोप

**जालना । प्रतिनिधी**

**जालना जिल्ह्यात बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनांमधील कथित गैरव्यवहाराच्या प्रकरणाला आता मोठे वळण मिळाले असून तत्कालीन जिल्हा सरकारी कामगार अधिकारी अमोल मानसिंग जाधव यांना पोलिसांनी जेलमध्ये टाकून अटक केली आहे. विशेष म्हणजे, परतूर येथे बांधकाम कामगारांचे अत्यावश्यक घरगुती संच बेकायदेशीररीत्या वाहतूक केल्याप्रकरणी पोलिसांत फिर्याद देणारे अधिकारीच पुढे या प्रकरणात आरोपी म्हणून अटक करण्यात आल्याने जालना जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. गोरगरीब बांधकाम कामगारांच्या हक्काचे १०० ट्रॅक साहित्य परस्पर विकल्याचा गंभीर आरोप या प्रकरणात आमदार बबनराव लोणीकर यांच्या वतीने करण्यात आला आहे.**

दि. २३ एप्रिल २०२६ रोजी परतूर शहरातील लालबहादूर शास्त्री परिसरात बांधकाम कामगार सनियंत्रण समितीच्या सदस्यांनी एमएच-११-एएल-५८१५ क्रमांकाचा आयशर ट्रक अडवून तपासणी केली होती. या वाहनामध्ये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या नोंदणीकृत १६६ कामगारांसाठी देण्यात येणारे अत्यावश्यक संच आढळून आले. या संचांची किंमत सुमारे ११ लाख २४ हजार ६५० रुपये, तर वाहनासह एकूण मुद्देमालाची किंमत सुमारे १६ लाख २४ हजार ६५० रुपये असल्याचे पोलिसांच्या फिर्यादीत नमूद आहे. कामगारांना देण्यात येणारे साहित्य अधिकृत पद्धतीने वितरित न करता परस्पर वळविले जात असल्याचा संशय यामुळे निर्माण झाला. या व्यतिरिक्त यदलापूर येथे ३३३ संच ५४ लाख ६७ हजार ६० रुपये किमतीचा मुद्देमाल मध्यरात्री विक्रीसाठी घेऊन जात असताना ट्रक पकडण्यात आला. तसेच वाटूर परिसरातील अवैध गोदामामध्ये देखील भांड्याचे संच (किंमत १ कोटी ०८ लाख १९ हजार ६५० रुपये) पकडून तिसरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. असा एकूण एक कोटी ७९ लाख ११ हजार ३६० रुपयांचा मुद्देमाल तीन ठिकाणाहून जप्त करण्यात आला आहे. त्यामुळे परतूरमधील घटना ही एकटी घटना नसून जिल्ह्यातील विविध भागांत कामगारांच्या अत्यावश्यक साहित्याच्या वितरणाबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. या सर्व प्रकरणांची साखळी, साहित्य वितरणाची पद्धत आणि त्यामागील यंत्रणा तपासण्याची



मागणी करण्यात येत आहे. या प्रकरणात सरकारी कामगार अधिकारी अमोल जाधव यांनी स्वतः परतूर पोलिसांत तक्रार दाखल करून संबंधित व्यक्तींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(४), ३(५) अन्वये कारवाईची मागणी केली होती. मात्र, पुढील तपासादरम्यान याच प्रकरणातील कथित गैरव्यवहारात अमोल जाधव यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात आली आणि पोलिसांनी त्यांना अटक केली, अशी माहिती समोर आली आहे. त्यामुळे ज्या अधिकाऱ्याने शासनाच्या वतीने गुन्ह्याची तक्रार केली, त्याच अधिकाऱ्यावर पुढे अटकेची कारवाई झाल्याने या प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले आहे. दरम्यान, या प्रकरणाची व्याप्ती केवळ अत्यावश्यक भांडी संचाच्या गैरव्यवहारापुरती मर्यादित नसल्याचे आरोप करण्यात आले आहेत. मयत बांधकाम कामगारांच्या वारसांना देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीत कथित गैरव्यवहार, बांधकाम कामगारांच्या मुलांसाठी असलेल्या शिष्यवृत्ती योजनेतील कथित अनियमितता, विवाह सहाय्य अनुदानातील कथित गैरव्यवहार तसेच घरकुल व इतर कल्याणकारी योजनांमधील लाभ मंजुरीबाबत गंभीर तक्रारी समोर आल्या आहेत. जिल्हाभरात या योजनांशी संबंधित मोठ्या प्रमाणावर प्रकरणे असल्याने या संपूर्ण प्रकरणाचा तपशील आणि आर्थिक व्याप्ती मोठी असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले आहे. गुन्ह्याचा तपशील मोठा असून विविध योजनांशी संबंधित अनेक प्रकरणांची चौकशी करणे आवश्यक आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तपास स्थानिक पातळीवर मर्यादित न ठेवता स्वतंत्र दर्जाच्या अधिकाऱ्यामार्फत करण्यात यावा, अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली आहे. मृत्यू अनुदान, शिष्यवृत्ती, विवाह सहाय्य, घरकुल सहाय्य आणि अत्यावश्यक साहित्य वितरण या सर्व योजनांतील लाभार्थी नोंदी, बँक व्यवहार, कागदपत्रे आणि वितरणाच्या नोंदींची सखोल तपासणी आवश्यक आहे. त्यामुळे डीवायएसपी दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करून किंवा स्थानिक गुन्हे शाखेकडे () या प्रकरणाचा पुढील तपास सोपवावा, अशी स्पष्ट मागणी आमदार लोणीकर यांनी केली आहे. बांधकाम कामगार सनियंत्रण समितीच्या सदस्यांनीही जालना जिल्ह्यातील कामगार कल्याण योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचे आरोप यापूर्वी केले आहेत. नैसर्गिक मृत्यू अनुदान, विवाह सहाय्य, शिष्यवृत्ती, घरकुल सहाय्य तसेच अत्यावश्यक साहित्य वाटप योजनेत बोगस लाभार्थी, बनावट कागदपत्रे, संशयास्पद मृत्यू प्रमाणपत्रे आणि दलालांच्या माध्यमातून आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या सर्व प्रकरणांची स्वतंत्र चौकशी, लाभार्थी नोंदींची पडताळणी आणि विशेष लेखापरीक्षण करण्याची मागणी करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणात आमदार बबनराव लोणीकर यांनी सातत्याने आक्रमक भूमिका घेत बांधकाम कामगारांच्या हक्कासाठी पाठपुरावा केला. गोरगरीब कामगारांना शासनाकडून मिळणारे घरगुती उपयोगाचे भांडी संच आणि विविध योजनांचे आर्थिक लाभ कोणत्याही परिस्थितीत दलालांच्या माध्यमातून हडप होऊ नयेत, दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी त्यांची ठाम भूमिका आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर सरकारी कामगार अधिकारी अमोल जाधव यांना अटक होणे ही या प्रकरणातील महत्त्वाची कारवाई मानली जात असून आमदार बबनराव लोणीकर यांच्या पाठपुराव्याला प्रचंड यश मिळाल्याची चर्चा आहे. ''गोरगरीबांच्या हक्काच्या साहित्यावर आणि पैशांवर डल्ला मारणाऱ्यांना माफी नाही; दोषी कोणताही असो, त्याच्यावर कठोर कारवाई झालीच पाहिजे,'' अशी भूमिका आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केली आहे. आता परतूर, यदलापूर आणि वाटूर परिसरातील भांड्यांचे ट्रक पकडल्याच्या प्रकरणांसह जिल्ह्यातील मागील काही वर्षांतील बांधकाम कामगार कल्याण योजनांची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. लाभार्थी यादी, बँक व्यवहार, साहित्य वितरणाच्या नोंदी, गोडाऊनमधून झालेला मालाचा पुरवठा आणि संबंधित कागदपत्रांची तपासणी करून दोषींवर कठोर प्रशासकीय व फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी आमदार बबन लोणीकर यांनी केले आहे.

# मेंदू निरोगी ठेवण्यासाठी-डॉ.जगदीश टेकाळे

बीड । प्रतिनिधी

मेंदुचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुरेशी आणि दर्जेदार झोप घेणे आवश्यक आहे. प्रौढ व्यक्तींनी दररोज किमान सात ते आठ तास झोप घेणे आवश्यक आहे. झोपेच्या काळात मेंदूमध्ये दिवसभर साचलेले चयापचयातील अपायकारक पदार्थ बाहेर टाकण्याची प्रक्रिया अधिक प्रभावीपणे घडते. स्मरणशक्ती मजबूत करणे, नवीन माहितीचे दीर्घकालीन संचयन करणे आणि मेंदूच्या पेशींना विश्रांती देणे ही महत्त्वाची कामे झोपेतच होतात. सातत्याने अपुरी झोप घेतल्यास एकाग्रता कमी होणे, निर्णयक्षमता बिघडणे आणि दीर्घकाळात स्मृतिभ्रंशासारख्या विकारांचा धोका वाढू शकतो.

सकाळी दहा ते पंधरा मिनिटे नैसर्गिक सूर्यप्रकाशात राहिल्याने शरीरातील जैविक घड्याळ संतुलित राहण्यास मदत होते. यामुळे मेलॅटोनीन आणि इतर जैविक संप्रेरकांचे संतुलन सुधारते, मन प्रसन्न राहते आणि रात्रीची झोप अधिक चांगली लागते. नियमित सूर्यप्रकाशामुळे व्हिटॅमिन डीची निर्मितीही होते, ज्याचा अप्रत्यक्ष फायदा मेंदूच्या आरोग्यालाही होतो. नियमित व्यायाम हा मेंदूसाठी औषधासारखा मानला जातो. विशेषतः स्क्वॅटस्सारखे पायांच्या मोठ्या स्नायूंना कार्यरत ठेवणारे व्यायाम रक्ताभिसरण सुधारतात. त्यामुळे मेंदूपर्यंत प्राणवायू आणि पोषक घटकांचा पुरवठा अधिक प्रभावीपणे होतो.वजन उचलण्याचे किंवा स्नायू बळकट करणारे व्यायाम केल्याने शरीरात काही जैविक घटक तयार होतात, जे मेंदूतील मज्जापेशींच्या कार्यक्षमतेला चालना देतात. संशोधनानुसार नियमित शक्तिवर्धक व्यायामामुळे स्मरणशक्ती, लक्ष केंद्रित करण्याची क्षमता आणि संज्ञानात्मक कार्यक्षमता सुधारण्यास मदत होऊ शकते. हेही लक्षात ठेवा व्हिटॅमिन बी-१२, ओमेगा-३ स्निग्धाम्ले फोलेट, लोह आणि व्हिटॅमिन डी यांची कमतरता मेंदूच्या कार्यक्षमतेवर परिणाम करू शकते. मानवी मेंदू हा सामाजिक संवादासाठी बनलेला आहे. त्यामुळे कुटुंबीय, मित्र आणि समाजाशी नियमित संवाद ठेवणे मानसिक आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते. एकाकीपणा, सामाजिक अलिप्तता आणि दीर्घकाळ एकटे राहणे यामुळे नैराश्य, चिंता आणि स्मरणशक्ती कमी होण्याचा धोका



वाढू शकतो. सबब रोज एखाद्या व्यक्तीशी मनमोकळा संवाद साधणे, मित्रपरिवारात सहभागी होणे किंवा सामाजिक उपक्रमांमध्ये भाग घेणे मेंदूला सक्रिय ठेवते. नवीन गोष्टी शिकण्याची सवय मेंदूला सतत कार्यरत ठेवते. नवीन भाषा शिकणे, एखादे वाद्य वाजवणे, चित्रकला, बुद्धिबळ, लेखन, वाचन किंवा कोणतीही नवीन कला आत्मसात करणे यामुळे मेंदूमध्ये नवीन मज्जासंयोग तयार होण्यास मदत होते. सततचा ताण शरीरातील कोर्टिसोल या संप्रेरकाची पातळी वाढवतो. दीर्घकाळ कोर्टिसोल वाढलेले राहिल्यास स्मरणशक्ती, एकाग्रता आणि निर्णयक्षमता यांवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. त्यामुळे ताण नियंत्रणात ठेवणे आवश्यक आहे. ध्यान, मौन किंवा श्वसनाचे व्यायाम हे मेंदूला विश्रांती देणारे प्रभावी उपाय आहेत. दररोज दहा मिनिटे ध्यान, प्राणायाम किंवा शांत बसून श्वासावर लक्ष केंद्रित केल्याने मन स्थिर राहते, तणाव कमी होतो आणि भावनिक संतुलन सुधारते. काही संशोधनांमध्ये नियमित ध्यानामुळे मेंदूच्या विचार आणि स्मरणशक्तीशी संबंधित भागांच्या कार्यक्षमतेवर सकारात्मक परिणाम दिसून आला आहे. मेंदू हे संपूर्ण शरीराचा नियंत्रणकेंद्र आहे. विचार करणे, निर्णय घेणे, आठवणी साठवणे, भावना व्यक्त करणे, शरीराच्या हालचाली नियंत्रित करणे आणि दैनंदिन जीवनातील प्रत्येक कृतीचे नियोजन करणे ही सर्व कामे मेंदू करत असतो. त्यामुळे मेंदूचे आरोग्य चांगले असेल तर शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्यही उत्तम राहते. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

# बीडमध्ये 'ड्राय पोर्ट' अन् 'लॉजिस्टिक पार्क' उभारणीचा मार्ग सुकर

**खा.बजरंग सोनवणे यांचा पाठपुरावा, केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांचे सकारात्मक पाऊल**

**बीड । प्रतिनिधी**

**मराठवाड्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या बीड जिल्ह्यात औद्योगिक अन्? कृषी विकासाला गती देण्यासाठी 'इनलँड ड्राय पोर्ट' आणि आधुनिक लॉजिस्टिक पार्क उभारण्याच्या हालचालींना केंद्र पातळीवर गती मिळण्याची चिन्हं आहेत. यासंदर्भात खा.बजरंग सोनवणे प्रयत्नशील असून त्यांनी केलेल्या निवेदनावर केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी सकारात्मक दखल घेत, पुढील कारवाईसाठी हे पत्र संबंधित विभागाकडे पाठवल्याची माहिती पत्राद्वारे दिली आहे.**

बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात कापूस, सोयाबीन, डाळिंब यांसह इतर कृषी उत्पादनांचे मोठे उत्पादन होते. तसेच जिल्ह्यात कृषी आधारित व लघु उद्योगांच्या विकासाला मोठा वाव आहे. मात्र, अत्याधुनिक लॉजिस्टिक आणि निर्यात सुविधा अभावी स्थानिक शेतकरी, व्यापारी व उद्योजकांना मोठा वाहतूक खर्च सोसावा लागतो आणि वेळही वाया जातो. बीड जिल्ह्याचे भौगोलिक स्थान मराठवाड्याच्या मध्यभागी असल्याने येथे 'ड्राय पोर्ट' व लॉजिस्टिक पार्क उभारल्यास कंटेनर वाहतूक, वेअरहाउसिंग, कोल्ड स्टोरेज आणि पॅकेजिंग सुविधा एकाच छताखाली उपलब्ध होतील, स्थानिक शेतीमालाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळणे सुलभ होईल, संपूर्ण मराठवाड्यात औद्योगिक गुंतवणुकीला चालना मिळून स्थानिक तरुणांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होतील. या सर्व बाबींचा विचार करून बीडमध्ये ड्राय पोर्ट आणि लॉजिस्टिक पार्कच्या उभारणीसाठी आवश्यक प्रशासकीय व वित्तीय मंजुरी द्यावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्याकडे १ ऑगस्ट २०२६ रोजी पत्राद्वारे केली हो

## पान १ वरून...

### मी गद्दारांच्या पाठीशी!

गेल्यानंतर डाग धुतले जातात. मात्र गद्दारीचा डाग धुणारं वॉशिंग मशीन अजून भाजपकडे आलेले नाही,'' असा टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला. देशातील सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना उद्धव ठाकरे यांनी ही लढाई केवळ शिवसेनेपुरती मर्यादित नसल्याचे म्हटले. पक्षांतर आणि राजकीय फोडाफोडीची पद्धत देशभर वाढत असल्याचा आरोप करत त्यांनी लोकशाही आणि संविधानावर विश्वास असलेल्या नागरिकांनी एकत्र येण्याचे आवाहन केले. ''गद्दारी करा, आमच्याकडे या आणि आम्ही तुमच्या पाठीशी आहोत, असा संदेश दिला जात आहे. हा संदेश इतर पक्षांमधील संभाव्य बंडखोर खासदारांनाही दिला जात आहे का?'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. देशातील तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला असून ही परिस्थिती गांभीर्याने घेण्याची गरज आहे. संविधान आणि लोकशाही वाचवण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहनही उद्धव ठाकरे यांनी यावेळी केले.

------------

### दुकानदार, किराणा व्यावसायिकांना

या संस्थेने दिले आहे. त्यांनी एक मोठी माहिती शेअर केली आहे. पीसीआयने एक्स पोस्टवर लिहिले की, युपीआय वापरणाऱ्या ग्राहकांकडून कोणताही चार्ज घेण्याचा प्रस्ताव नाही. किराणा स्टोअर, छोटे व्यापारी शिवाय करण्यात येणार व्यवहारांसाठी युपीआय पेमेंट करता येईल. हे स्पष्टीकरण पेमेंट आणि गेटवे प्रणाली विधेयक २०२६ च्या सुधारणा विधेयकानंतर आले आहे.

--------------

### नीटचे प्रश्न फोडण्यासाठी

होती. गोपनीयतेचा भंग करून त्याने २५ ते २७ एप्रिलदरम्यान पुण्यात ९ व लातुरात तीन विद्यार्थ्यांचे स्पेशल क्लास घेतले. याच विद्यार्थ्यांपर्यंत केमिस्ट्रीचा लीक पेपर पोहोचवला गेला. सीबीआयने तपास करताना मायगेट ॲपचे एंट्री रेकॉर्ड व मोबाइल सीडीआरचा मेळ घातला. या दोन्हीवरून विद्यार्थ्यांचे कुलकर्णीच्या घरी ये-जा व स्पेशल क्लासमधील सहभागाला पुष्टी मिळाली. विद्यार्थ्यांच्या लिखित नोट्सही लीक प्रश्नपत्रिकेशी जुळल्या. या नोट्स कुलकर्णीन दिलेल्या माहितीच्या आधारे तयार केलेल्या होत्या. कुलकर्णीच्या मोबाइलमधून नीट-यूजी २०२६ च्या पेपरशी तंतोतंत जुळणारी केमिस्ट्री प्रश्नपत्रिका व आन्सर स्लिपचे ९ फोटो मिळाले. मोबाइलमध्ये उमेदवार, त्यांचे पालक आणि इतर आरोपींशी संभाषणाचे पुरावेही मिळाले. परीक्षेनंतर एका उमेदवाराच्या आईने खूश होऊन कुलकर्णीला घड्याळ भेट देणार असल्याचेही म्हटले होते, असा दावा यंत्रणेने केला आहे.

------------

### अमेरिकेची नवी खेळी; भारतावर

सांगतात. यात रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन, वरिष्ठ राजकीय आणि लष्करी अधिकारी, वित्तीय संस्था, ऊर्जा प्रकल्प आणि रशियाच्या युद्धयंत्रणेशी संबंधित इतर संस्थांवर निर्बंध लागू करण्याचेही प्रस्तावित आहे. जर अमेरिकेने १०० टक्के आयात शुल्क लागू केले तर अमेरिकेतील आयातदारांसाठी भारतीय वस्तू आयात करणे महाग होईल. याचा फटका अभियांत्रिकी उत्पादने, औषधे, रसायने, कापड आणि वाहनांचे सुटे भाग यांसारख्या निर्यातीवर होऊ शकतो. २०२२ मध्ये रशिया-युक्रेन युद्धाला सुरूवात झाल्यापासून भारताने रशियाकडून सवलतीच्या दरात कच्च्या तेलाच्या खरेदी मोठ्या प्रमाणात वाढवली. रशियाचा युक्रेनसोबत संघर्ष सुरू झाल्यानंतर युरोपियन देशांनी रशियाकडून कच्च्या तेलाची खरेदी थांबवली. त्यानंतर भारताला मोठ्या सवलतीच्या दरात तेल मिळाले. यामुळे भारतीय तेल शुद्धीकरण प्रकल्पांना कच्च्या तेलाचा कमी खर्चात आणि सुरळीत पुरवठा होण्यास मदत झाली.

--------------

### मनोज जरांगेंनंतर आता

येणाऱ्या अटी-शर्तीवरून नरेंद्र पाटील यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. याबाबत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडे वारंवार तक्रारी करूनही कारवाई झाली नसल्याचा दावा त्यांनी केला आहे. त्यामुळे मराठा समाजातील तरुणांना एकत्रित करून सरकारविरोधात आंदोलन उभारण्याचा इशाराही नरेंद्र पाटील यांनी दिला आहे. काही अधिकारी अति हुशार आहेत. जात प्रमाणपत्र देताना खोडसाळपणा करतात, असा थेट आरोप नरेंद्र पाटील यांनी केला आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांकडून लावण्यात येणाऱ्या अटी-शर्तीवरून नरेंद्र पाटील यांनी नाराजी व्यक्त केली. संबंधित अधिकारी मराठा समाजातील असूनही अशा अटी का लावल्या जात आहेत, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. दरम्यान, २०२५ मध्ये प्रमाणपत्र घेऊन महामंडळाच्या माध्यमातून कर्ज घेतलेल्या अनेक तरुणांना कागदपत्रे अपलोड करता न आल्याने लाभापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे मराठा समाजातील अनेक तरुणांचे फोन आल्याचा दावा देखील नरेंद्र पाटील यांनी केला. महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी घेतलेल्या निर्णयांविरोधात आपण लेखी पत्र दिले असून, मंत्रिमंडळाच्या उपसमितीसह मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनाही तक्रार केल्याचं पाटील यांनी सांगितले. वारंवार तक्रारी करुनही कारवाई होत नसल्याने आता मराठवाड्याचा दौरा करत आंदोलनाची पूर्वतयारी सुरू केली आहे. तरुणांच्या गाठीभेटी घेऊन जनजागृती करण्याचा उद्देश आहे, तसेच एकत्रित आल्याशिवाय सरकारला आक्रोश कळणार नाही असेही नरेंद्र पाटील म्हणाले.

--------------

### महंत नामदेव महाराज शास्त्री

विनंती करू नये, तसेच दवाखान्यात भेटीसाठी येण्याचे टाळावे. डॉ नामदेव महाराज शास्त्रीजींना दवाखान्यातुन सुटी मिळाल्यानंतर ते सर्वांना श्रीक्षेत्र भगवानगड येथे भेटणार आहेत. भेटीची तारीख जाहीर केली जाणार आहे. शास्त्री बाबांवर उपचार करणारे सर्व डॉक्टर्स, नर्स आणि इतर वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी जो सेवाभाव ठेवला त्याबद्दल श्रीक्षेत्र भगवानगडाचे भाविक भक्त यांचे ऋण व्यक्त करण्यात आले आहे.

-----------

### मेटाला ९ हजार कोटींचा

तपासात असे उघड झाले की मेटाच्या प्लॅटफॉर्मचे अल्गोरिदम मुलांना दीर्घकाळ गुंतवून ठेवण्यासाठी तयार केले होते, ज्यामुळे त्यांच्यामध्ये व्यसन, नैराश्य आणि इतर मानसिक आरोग्य समस्यांचा धोका वाढला. हा खटला केवळ मानसिक आरोग्यापुरता मर्यादित नव्हता. प्लॅटफॉर्मचा वापर मुलांना जाळ्यात अडकवण्यासाठी आणि त्यांचे लैंगिक शोषण करण्यासाठीही केला जात असल्याचा आरोप करण्यात आला होता, आणि याची माहिती असूनही कंपनीने पुरेशी कारवाई केली नाही.मेटाने हा निर्णय स्वीकारण्यास नकार दिला आहे. कंपनीने म्हटले आहे की ती दंडाविरुद्ध अपील करेल. कंपनीचा युक्तिवाद आहे की ती प्लॅटफॉर्मवरील सुरक्षा सुधारण्यासाठी सतत काम करत आहे, परंतु सर्व ''गैरवर्तन करणाऱ्यांना'' थांबवणे आव्हानात्मक आहे.न्यायाधीशांच्या शिफारसी स्वीकारल्या जातील: खटल्याचा दुसरा भाग, म्हणजेच ट्रायल बेंच, हे ठरवू शकते की मेटाला तिच्या अल्गोरिदममध्ये अनिवार्य बदल करावे लागतील का आणि बाल सुरक्षा कार्यक्रमांसाठी तिला अधिक आर्थिक जबाबदारी घ्यावी लागेल का.मोठा दबाव: या निर्णयानंतर, इतर ४० हून अधिक राज्यांचे ॲटर्नी जनरल देखील मेटाविरुद्ध कठोर भूमिका घेऊ शकतात, ज्यामुळे भविष्यात कंपनीवर कायदेशीर आणि नियामक दबाव वाढेल.

--------------

### कारखानदारांकडून शेतकऱ्यांची

उभारावी, अशी मागणी करण्यात आली. उसाच्या वजनात होणारे गैरप्रकार आणि बोगस नोंदी टाळण्यासाठी एका महत्त्वाच्या उपाययोजनेची मागणी बैठकीत करण्यात आली. ज्या शेतकऱ्यांच्या नावे प्रत्येक हंगामात ५०० टनांपेक्षा जास्त ऊस दाखवला जातो, अशा संशयास्पद वाटणाऱ्या सर्व शेतकऱ्यांची नावे प्रत्येक हंगामात सार्वजनिकरित्या जाहीर करण्यात यावीत, जेणेकरून पारदर्शकता राहील.चालू गळीत हंगामात आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत बाजारपेठेत साखरेचे तसेच उपपदार्थांचे (बाय-प्रॉडक्ट्स) दर वाढले आहेत. त्यामुळे कारखान्यांचा नफा वाढला असून, त्यांनी शेतकऱ्यांना प्रतिटन ३०० रुपयांचा दुसरा हप्ता तातडीने द्यावा. तसेच देशात आणि राज्यात साखरेचा पुरेसा शिल्लक साठा उपलब्ध असल्यामुळे केंद्र सरकारने कोणत्याही परिस्थितीत साखर आयात करण्याचा निर्णय घेऊ नये, असे स्वाभिमानीने स्पष्ट केले. यावेळी राजू शेट्टी यांनी राजकीय व्यवस्थेवरही कडाडून टीका केली. राज्याच्या सहकार मंत्र्यांच्याच साखर कारखान्याने शेतकऱ्यांची एफआरपी दिली नसल्याचा आरोप करत, ''जर सहकार मंत्रीच नियम पाळत नसतील, तर प्रशासन कायदेशीर कारवाई नक्की कोणावर करणार?'' असा थेट सवाल शेट्टींनी मंत्री बाबासाहेब पाटील यांच्यावर टीका केली. या बैठकीला ॲड. योगेश पांडे , प्रभाकर बांगर यांचेसह साखर आयुक्त कार्यालयातील अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

-------------

cmyk

## शांतीब्रह्म एकनाथ महाराज पालखीचे खरवंडीत स्वागत



पाथर्डी । प्रतिनिधी

शांतीब्रह्म एकनाथ महाराज पालखीचे खरवंडी कासार येथे देवनाथ फाउंडेशन अध्यक्ष डॉ.ज्ञानेश्वर दराडे तसेच खरवंडी कासार परिसरातील नाथ भक्तांनी एकनाथ महाराजांच्या पालखीला खांदा देऊन स्वागत करण्यात केले.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार, दि. ०९ ऑगस्ट २०२६



# अजितदादांनी जिल्हा क्रीडा संकुलाच्या विकासकामांसाठी २५ कोटींचा निधी दिला मात्र सत्ताधारी आणि नगरपालिकेला निधी मंजूर असुनही क्रीडा संकुलाचा रस्ता खड्ड्यात!

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा क्रीडा संकुलाच्या विकासकामांसाठी तत्कालीन पालकमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांनी सुमारे २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून शासन आदेशही निर्गमित केला मात्र दुसरीकडे जालना रोड ते जिल्हा क्रीडा संकुल या महत्त्वाच्या रस्त्याची अक्षरशः चाळण झाली असून, निधी उपलब्ध असतानाही रस्त्याचे काम पूर्ण होत नसल्याने खेळाडू, पालक आणि नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. सत्ताधारी आणि नगरपालिका प्रशासनाने केवळ उद्घाटने व सोशल मीडियावरील फोटोसेशनची स्टंटबाजी न करता प्रत्यक्ष विकासकामे पूर्ण करावीत, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी पालकमंत्री सुनेत्रा पवार, जिल्हाधिकारी आणि बीड नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे. सोमवार रोजी नगरपरिषद कार्यालयासमोरील रस्त्यावर क्रिकेट खेळुन लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येणार आहे

**क्रीडा संकुलासाठी २४ कोटी ९५ लाखांची विकासकामे**

बीडचे तत्कालीन पालकमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांनी जिल्हा क्रीडा संकुलास भेट देऊन खेळाडू व क्रीडाप्रेमी नागरिकांशी संवाद साधला होता. क्रीडा संकुलातील विविध समस्यांची पाहणी केल्यानंतर विकासकामांसाठी सुमारे २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. त्यापैकी २४ कोटी ९५ लाख रुपयांच्या विविध कामांना मंजुरी देण्यात आली आहे.

या निधीत सिंथेटिक ॲथलेटिक ट्रॅक, फुटबॉल व हॉकी मैदान, व्हॉलीबॉल, कबड्डी व खो-खो मैदान, इनडोअर हॉलचे अद्ययावतीकरण, वसतिगृहाच्या तिसऱ्या मजल्याचे बांधकाम, रेन वॉटर हार्वेस्टिंगसह विविध क्रीडा सुविधांचा समावेश आहे.

**खेळाडूंच्या वाट्याला मात्र खड्डे आणि चिखल**

बीड शहरात वास्तव्यास असलेले राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर जिल्ह्याचे




प्रतिनिधित्व करणारे अनेक होतकरू खेळाडू नियमितपणे जिल्हा क्रीडा संकुलात सरावासाठी येतात. मात्र जालना रोड ते जिल्हा क्रीडा संकुल हा महत्त्वाचा रस्ता अत्यंत खराब झाला असून, जागोजागी मोठमोठे खड्डे पडले आहेत.

पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने रस्त्याला अक्षरशः तलावाचे स्वरूप आले आहे. पाण्याखालील खड्ड्यांची खोली वाहनचालकांना लक्षात येत नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. खेळाडू दुचाकीवरून घसरून पडणे, पाय मुरगळणे यासारख्या घटना घडत असून, पालकांमध्येही चिंता निर्माण झाली आहे. रस्त्याच्या परिसरात घाणीचे साम्राज्य असल्याने खेळाडूंच्या आरोग्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

**निधी मिळूनही कामे रखडण्याचे कारण काय?**

बीड शहरातील रस्त्यांची दुरवस्था लक्षात घेऊन तत्कालीन पालकमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांनी शहरातील २२ रस्त्यांसह एकूण ३० विकासकामांसाठी सुमारे २२ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. जानेवारी २०२६ मध्ये या कामांसाठी निधी उपलब्ध झाला. उन्हाळ्यात वर्कऑर्डर झालेल्या कामांची पावसाळ्यात उद्घाटने करण्यापेक्षा प्रत्यक्ष कामे पूर्ण करून नागरिकांना दिलासा देणे गरजेचे आहे.

निधी मंजूर असूनही विकासकामे वेळेत पूर्ण होत नसतील, तर त्याला जबाबदार कोण? असा सवाल उपस्थित करत सत्ताधारी आणि नगरपालिका प्रशासनाने ढिसाळ नियोजन झटकून जालना रोड ते जिल्हा क्रीडा संकुल रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करावे अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

**२४ कोटी ९५ लाखांचा निधी कुठे खर्च होणार?**

सिंथेटिक ॲथलेटिक ट्रॅक फुटबॉल-हॉकी मैदान व्हॉलीबॉल कबड्डी खो-खो मैदान इनडोअर हॉल अद्ययावतीकरण वसतिगृहाचा तिसरा मजला रेन वॉटर हार्वेस्टिंग

**खेळाडूंच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर**

जालना रोड ते जिल्हा क्रीडा संकुल रस्त्यावर मोठमोठे खड्डे; पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने अपघाताचा धोका. सरावासाठी जाणाऱ्या खेळाडूंच्या दुचाकी घसरून पडण्याच्या घटना.

**उद्घाटनांची स्टंटबाजी नको; कामे पूर्ण करा!**

निधी मंजूर आणि वर्कऑर्डर झाल्यानंतरही कामे रखडत असतील तर जबाबदारी निश्चित करा. सत्ताधारी व नगरपालिका प्रशासनाने सोशल मीडिया फोटोसेशनपेक्षा प्रत्यक्ष विकासकामांना प्राधान्य द्यावे डॉ. गणेश ढवळे

## परळी वैजनाथ शिवसेना तालुका उपप्रमुखपदी अशोक दहीफळे नियुक्ती

परळी । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील खोडवा सावरगाव येथील शिवसैनिक अशोक रावसाहेब दहिफळे यांची शिवसेना (एकनाथ शिंदे गट) परळी वैजनाथ तालुक्याच्या उपतालुकाप्रमुख (धर्मापुरी विभाग) पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्याचे शिवसेना राज्य समन्वयक फुलचंद (भाऊ) कराड यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते माननीय ना एकनाथरावजी शिंदे साहेब, मा. खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे यांच्या आदेशा वरून शिवसेना सचिव संजयजी मोरे साहेब, लोकसभा संपर्कप्रमुख मनोजजी शिंदे साहेब यांच्या सूचनेवरून आपली परळी तालुका शिवसेनेच्या उपतालुकाप्रमुख (विभाग धर्मापुरी) पदी नियुक्ती करण्यात येत आहे. भविष्यात आपण हिंदुहृदय सम्राट शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे तथा धर्मवीर आनंद दिघे साहेब यांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचून शिवसेना वाढीचे कार्य करावे असे नियुक्ती पत्रात नमूद करण्यात आले आहे.या नियुक्तीप्रसंगी तालुकाप्रमुख व्यंकटेश शिंदे, शहराध्यक्ष वैजनाथ माने, परळी तालुका समन्वयक माऊली फड (धर्मापुरीकर), यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. नियुक्तीनंतर अशोक दहिफळे यांनी पक्ष नेतृत्वाने दाखविलेल्या विश्वासाबद्दल आभार व्यक्त करत, उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी तसेच पक्षाची विचारधारा तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करणार असल्याची भावना व्यक्त केली. त्यांच्या निवडीबद्दल शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते तहसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## येळंबघाट येथे केंद्रस्तरीय शिक्षण परिषद संपन्न

येळंब घाट । प्रतिनिधी

येथील बळवंतराव कदम माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात आज दिनांक पाच ऑगस्ट २०२६ रोजी येळंब घाट केंद्र अंतर्गत आयोजित चालू २६-२७ शैक्षणिक वर्षातील पहिल्या केंद्रीय शिक्षण परिषदेचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले. माननीय गटशिक्षणाधिकारी मॅडम, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी क्षीरसागर साहेब, यांच्या मार्गदर्शनाखाली व संयोजक समूह साधन केंद्राच्या केंद्र समन्वयक श्रीमती. देशमुख एस. एस. यांच्या आयोजनातून अतिशय उत्साही व शैक्षणिक वातावरणात २०२६ २७ शैक्षणिक वर्षातील पहिली केंद्रस्तरीय शिक्षण परिषद बळवंतराव कदम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पार पडली. विद्यालयाचे प्राचार्य. श्री करडीले. डी. एन. यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या परिषदेत केंद्रीय प्राथमिक शाळेचे केंद्रीय मुख्याध्यापक श्री




वाघमारे सर यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होती, तर मार्गदर्शक म्हणून श्री अशोक कोकाटे सर, श्री अतुल वाघमारे सर, व श्री सदाशिव रोकडे सर यांची उपस्थिती होती . कार्यक्रमाची सुरुवात आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमापूजनाने व दीप प्रज्वलन करून करण्यात आली . याप्रसंगी संयोजिका, केंद्र समन्वयक श्रीमती देशमुख मॅडम यांनी आढावा घेत परिषदेचे प्रास्ताविक केले प्रस्ताविकात त्यांनी सांगितले की, शिक्षण परिषद शाळांच्या आणि विध्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी आवश्यक असून या मुळे शासनाचे विविध शैक्षणिक धोरणे व शिक्षणातील बदल या बाबत शिक्षकांना अवगत करून विध्यार्थ्यांच्या गुणवंत्ता वाढीसाठी व त्यांच्या मध्ये अभ्यासाची गोडी लागावी यासाठी व निकोप शैक्षणिक वाढ व्हावी हा हेतू असून केंद्रातील शैक्षणिक सुधारासाठी निश्चित या शिक्षण परिषदेचा फायदा होईल. चालू शैक्षणिक वर्षातील करावयाची प्रशासकीय कामे, गुणवत्ता वाढीबाबत करावयाची कार्यवाही याबद्दल त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. खान अकॅडमी, शालेय व्यवस्थापन समिती पुनर्रचना, दीक्षा कोर्सेस, व शालेय कामकाजाच्या अनुषंगाने आवश्यक त्या अनेक बाबीवर या परिषदेत चर्चासत्र पार पडली.शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवलेल्या व त्यांना घडवणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले.इयत्ता चौथी ,सातवी स्कॉलरशिप, पाचवी, आठवी स्कॉलरशिप, पाचवी नवोदय या परीक्षेतील पात्र विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शक करणाऱ्या अध्यापकांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला . येळंबघाट केंद्र अंतर्गत येणाऱ्या १५ माध्यमिक व प्राथमिक शाळा यांचे मुख्याध्यापक , व शिक्षक यांची या परिषदेस उपस्थिती होती . खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या परिषदेचे अत्यंत बहारदार सूत्रसंचालन विद्यालयाचे उप मुख्याध्यापक श्री चौरे व्ही. एस. यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षक श्री लहाने डी एस , श्री कदम एन . पी श्री कांबळे डि .आर. श्री सुरवसे. एस. जी सह आदींनी सर्व व्यवस्थेचे उत्कृष्ट नियोजन केलेल्या या परिषदेची सांगता वंदे मातरम् ने करण्यात आले.

## बाबुराव पोटभरेंचा 'संघर्ष योद्धा' पुरस्काराने होणार गौरव

माजलगाव । प्रतिनिधी

वंचित, पीडित, शोषित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी तब्बल ३८ वर्षांपासून सातत्याने संघर्ष करणारे बहुजन नेते तथा बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांना त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत 'संघर्ष योद्धा' पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.या पुरस्काराबद्दल कृषी उत्पन्न बाजार समिती, माजलगावच्या कार्यालयात दि ०७ ऑगस्ट शुक्रवार रोजी त्यांचा उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. वंचित, पीडित आणि शोषित समाजघटकांना न्याय मिळवून देण्यासाठी बाबुराव पोटभरे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून



सामाजिक चळवळीच्या माध्यमातून प्रभावीपणे आवाज उठविला आहे.सामाजिक प्रश्नांवर सातत्याने भूमिका घेत अन्यायाविरोधात संघर्ष करण्याची त्यांची कार्यपद्धती राहिली आहे. त्यांच्या या प्रदीर्घ सामाजिक योगदानाची दखल घेत त्यांना 'संघर्ष योद्धा' पुरस्कार जाहिर करण्यात आला. पुरस्कार मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयात त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे, कचरू (तात्या) खळगे नवनाथ (अण्णा) धाईजे,प्रदीप पट्टेकर ,लेखापाल उद्धव फपाळ,सांख्यिकी अधिकारी मोतीराम चव्हाण,निरीक्षक सुनील सवणे, कोषपाल मीनानाथ मुळे, वरिष्ठ लिपिक अमोल आगे,प्रतवारीकार अतुल होके, नाईक शेख रहीम व सर्व कर्मचारी बांधव उपस्थित होते.

## तिरंग्याच्या सन्मानासाठी पंकजाताई मुंडेंच्या उपस्थितीत गेवराईत १३ ऑगस्टला हर घर तिरंगा रॅली

### बहुसंख्येने उपस्थित रहा - बदामराव पंडित, बाळराजे पवार







गेवराई । प्रतिनिधी

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी, गेवराई विधानसभा मतदारसंघाच्या वतीने गुरुवार, दि. १३ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता गेवराई शहरात भव्य 'घर घर तिरंगा' रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

या रॅलीस महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे, माजी राज्यमंत्री तथा भाजपा नेते बदामराव पंडित, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, भाजपा नेते बाळराजे पवार, माजी सभापती तथा भाजपा नेते युधाजीत पंडित, युवा नेते यशराज पंडित, युवा नेते शिवराज पवार, युवा नेते रोहित पंडित यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या रॅलीत संयोजक यशराज पंडित, शिवराज पवार यांच्यासह भाजप विधानसभा समन्वयक श्रीकांत सानप, मंडळ अध्यक्ष उध्दव रासकर, सचिन दाभाडे, राजेश पवार यांच्यासह युवक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. रॅलीची सुरुवात लोकनेते बदामराव पंडित यांच्या निवासस्थानापासून होऊन शास्त्री चौक येथे समारोप होणार आहे. यावेळी ना पंकजाताई मुंडे या उपस्थित युवकांशी संवाद साधणार आहेत. राष्ट्रध्वजाबद्दल अभिमान आणि देशभक्तीची भावना जागृत करण्याच्या उद्देशाने आयोजित या रॅलीत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक युवानेते यशराज पंडित व भारतीय जनता पार्टीच्या वतीने करण्यात आले आहे.

## पान ६ वरुन...

पान ६ वरुन...

### अन्यथा १५ ऑगस्टला पालकमंत्र्यांना

ताफ्यासमोर आंदोलन केले होते आणि एका युवकाने आत्मदहनाचा प्रयत्न केल्याची आठवणही तक्रारीत करून देण्यात आली आहे. तक्रारीमध्ये मुदतवाढ तात्काळ रद्द करणे, करारानुसार दंडात्मक कारवाई करणे, अपूर्ण कामाची कोणतीही बिले अदा न करणे, वरिष्ठ तांत्रिक समितीकडून कोअर कट व मटेरियल टेस्ट करणे, दोषी अधिकाऱ्यांवर विभागीय चौकशी सुरू करणे आणि कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकणे अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

सरवदे यांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा देत म्हटले आहे की, तक्रार प्राप्त झाल्यानंतर दोन दिवसांत प्रत्यक्ष काम पूर्ण क्षमतेने सुरू झाले नाही, तर १५ ऑगस्ट रोजी पालवन, पिंपळवाडी, डोकेवाडा, बेलखंडी, मंजिरी, धुमाळवाडीसह ५० ते ६० गावांतील नागरिकांच्या उपस्थितीत तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल. तसेच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यांना काळे झेंडे दाखवून निषेध व्यक्त करण्यात येईल.

या आंदोलनातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यास जिल्हा प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित अधिकारी जबाबदार राहतील, असा स्पष्ट इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. त्यामुळे पालवनदेवराई रस्ता प्रकरण आता जिल्ह्यातील एक मोठा सार्वजनिक आणि राजकीय मुद्दा बनण्याची चिन्हे दिसत आहेत.

### श्रीकृष्ण विद्यालयाची कबड्डी

ठरली. अभ्यासाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळविल्याने श्रीकृष्ण विद्यालयाच्या शैक्षणिक व क्रीडा वाटचालीत आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला आहे.

मेहनतीला मिळाले यशाचे फळ

या यशाबद्दल विद्यालयातील सर्व विजयी खेळाडू, सहभागी स्पर्धक तसेच क्रीडा शिक्षकांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशामुळे मातकुळी गावासह श्रीकृष्ण विद्यालयाच्या नावलौकिकात भर पडली असून, भविष्यातही हे खेळाडू जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये विद्यालयाचे नाव उज्ज्वल करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. ''मैदानावर घाम गाळणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मेहनतीला यशाची ट्रॉफी मिळाली; श्रीकृष्ण विद्यालयाच्या क्रीडापटूंनी पुन्हा एकदा विजयाचा झेंडा फडकविला!''

### युपीएससी मध्ये पहिल्याच

पदासाठीच्या परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात यश मिळविले. त्याची असिस्टंट कमांडंट म्हणून नियुक्ती झाली आहे.प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्याने मिळवलेले हे यश ग्रामीण भागातील तरूणांसाठी प्रेरणादायी आहे. चैतन्य..तुझे मनःपूर्वक अभिनंदन..! अशा शब्दांत ना. पंकजाताईंनी अभिनंदन केले आहे.

### आष्टी पंचायत समितीचे

रोजी सकाळी ९ वाजता आष्टी-शेकापूर रोडवरील ताईबाई माळा जवळील शेतामध्ये अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. या दुःखद प्रसंगी फुंदे कुटुंबीय, नातेवाईक व आप्तेष्टांनी नागरिकांनी अंत्यसंस्कारासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन जगदंबा तरुण मंडळ, सायकड गल्ली, आष्टी यांच्या वतीने करण्यात आले आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो व फुंदे परिवाराला हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो, हीच भावपूर्ण श्रद्धांजली.

### महानगरांच्या धर्तीवर आष्टी-

तरी वेळ कमी आहे. एखाद्या छोट्याशा कामासाठी नागरिकांचा अर्धा दिवस खर्च होतो. त्यामुळे नागरिकांचा वेळ वाचवून त्यांच्या गरजेच्या वस्तू घरापर्यंत पोहोचविण्याचे काम 'क्विक कनेक्ट'च्या माध्यमातून होणार आहे. आष्टीसारख्या शहरात महानगरांच्या धर्तीवर सुविधा उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे. आष्टी आणि मुर्शदपूरकरांनी या सेवेचा लाभ घ्यावा,'' असे आवाहन त्यांनी केले.स्थानिक गरजा आणि बदलती जीवनशैली लक्षात घेऊन 'क्विक कनेक्ट'ची संकल्पना राबविण्यात आली आहे. ग्राहकांना आवश्यक वस्तूंसाठी वारंवार बाजारात जाण्याची गरज भासू नये, तसेच त्यांचा वेळ आणि श्रम वाचावेत, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे आष्टी शहरातील नागरिकांसाठी ही सेवा काळाची गरज ठरणार असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले. या शुभारंभ प्रसंगी व्यापारी संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष संजय मेहेर, नवनित कासवा, विजय बोगावत, सुभाष बोंदार्डे, प्रविण कदम, रिजवान शेख, कैलास दरेकर, पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष सानप, पत्रकार शरद तळेकर, प्रविण पोकळे, रघुनाथ कर्डिले, शरद रेडेकर, मनोज पोकळे, पांडुरंग दळवी, शशिकांत डोमकावळे, चेतन मेहेर, प्रितम बोगावत, अक्षय कासवा, पारस मेहेर, अंकीत जोशी, निखील कटारिया, निखील ढेगे, शिवलाल कटारिया, देवेश जोशी, योगेश कुंभकर्ण यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरज शिंदे यांनी केले, तर आभार गणेश दळवी यांनी मानले.

वेळ वाचविण्यासह ग्राहकांना घरपोच सेवा

'क्विक कनेक्ट'मुळे नागरिकांना आपल्या दैनंदिन गरजेच्या वस्तूंसाठी बाजारात जाण्याची आवश्यकता कमी होणार असून, एका फोनवरून आवश्यक वस्तू मागविता येणार आहेत. त्यामुळे विशेषतः नोकरदार, व्यावसायिक, ज्येष्ठ नागरिक तसेच वेळेअभावी बाजारात जाता न येणाऱ्या नागरिकांसाठी ही सेवा उपयुक्त ठरण्याची अपेक्षा आहे. आष्टी शहरात आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने 'क्विक कनेक्ट'चा शुभारंभ हा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.

-संजय मेहेर,व्यापारी आष्टी

## वडवणीत प्रथमच जिल्हा परिषदेच्या शाळांतील लेकरांच्या यशाला मानाचा मुजरा

### गटसाधन केंद्राचा प्रेरणादायी गुणगौरव सोहळा संपन्न * शिक्षण क्षेत्रात गुणवत्तेचा नवा वडवणी पॅटर्न

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी पंचायत समिती अंतर्गत तालुका गटसाधन केंद्राच्या वतीने व तालुक्याचे कार्यतत्पर गटशिक्षणाधिकारी राहुल भट्टी यांच्या संकल्पनेतून आयोजित जिल्हा परिषद शाळांतील वडवणी तालुका गुणवंत गुणगौरव सोहळा-२०२६ हा प्रेरणादायी कार्यक्रम बुधवार, दि.५ ऑगस्ट २०२६ रोजी गटसाधन केंद्र, वडवणी येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. वडवणी तालुक्यात प्रथमच जिल्हा परिषदेच्या शाळांतील लेकरांच्या कौतुकाचा अशा मोठ्या स्वरुपाचा गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा आयोजित करण्यात आल्याने विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समिती वडवणीचे गटविकास अधिकारी अशोक बाराखोते हे होते. त्यांच्या हस्ते तालुक्यातील विविध स्पर्धा परीक्षा व शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ देवून गौरव करण्यात आला. यामध्ये शासकीय सैनिकी विद्यालयासाठी प्रवेश मिळविलेले अथर्व बंडू नागरगोजे व राजवीर मुकुंदराज घुगे, तसेच जवाहर नवोदय विद्यालयासाठी प्रवेश मिळविलेले तनिष्का उध्दव बडे, पियुष कल्याण तांदळे व यश भानुदास गाडे यांचा विशेष गौरव करण्यात आला. तसेच शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी शिवम गंगाराम यादव, प्रांजल मल्हारी चोले, अर्पिता राजेभाऊ राठोड व आर्यन आसाराम मुंडे यांचाही सत्कार करण्यात आला. याशिवाय क्रीडा प्रबोधिनी, बालेवाडी (पुणे) येथे पुढील शिक्षणासाठी पात्र ठरलेली गुणवंत विद्यार्थिनी समृध्दी सुधाकर मुंडे हिचाही विशेष सन्मान करण्यात आला. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांसोबत त्यांच्या आई-वडील पालकांचाही सन्मान करुन त्यांच्या प्रोत्साहन व योगदानाबध्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या सर्व विद्यार्थ्यांच्या यशामागे मोलाचे योगदान देणारे त्यांचे मार्गदर्शक शिक्षक ए.आर.मुंडे सर, जी.एस.मुंडे सर, एस.एस.चिकाळकर सर, व्ही.ए.काकडे सर, डी.जी.टिपरे सर, आर.आर.धाईतिडक सर, एन.आर.बर्गे मॅडम व जे.एस.भस्करे सर यांचाही अभिनंदनपत्र व पुष्पगुच्छ देवून मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास देवळा केंद्राचे केंद्रप्रमुख ज्ञानेश्वर आळणे, चिंचवण केंद्राचे केंद्रप्रमुख रणजीत शिंदे, पिंपरखेड केंद्राचे केंद्रप्रमुख प्रफुल्ल टकले, वडवणी केंद्राचे केंद्रप्रमुख नितीन डोंगरदिवे, चिंचाळा केंद्राचे केंद्रप्रमुख



अरुण शिंदे, काडीवडगांव केंद्राचे केंद्रप्रमुख रामकिसन सांगळे तसेच कन्या वडवणी केंद्राचे केंद्रप्रमुख कृष्णा शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी गटशिक्षणाधिकारी राहुल भट्टी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये अपार क्षमता आहे. योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव आणि शिक्षक-पालकांचे सहकार्य मिळाल्यास विद्यार्थी मोठ्या स्पर्धांमध्ये निश्चित यश मिळवू शकतात. या गुणवंतांचा सन्मान म्हणजे त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव असून इतर विद्यार्थ्यांसाठीही ही मोठी प्रेरणा आहे. तालुक्यातील प्रत्येक शाळा गुणवत्तेच्या दिशेने वाटचाल करेल, हा आमचा संकल्प आहे असेही यावेळी गटशिक्षणाधिकारी भट्टी म्हणाले. अध्यक्षीय समारोपाप्रसंगी गटविकास अधिकारी अशोक बाराखोते यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, शिक्षण ही समाजाच्या प्रगतीची खरी गुरुकिल्ली आहे. विद्यार्थ्यांचा गौरव म्हणजे उज्ज्वल भविष्यातील गुंतवणूक आहे. पंचायत समिती शिक्षण क्षेत्राच्या उन्नतीसाठी कटिबध्द असून गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन केले जाईल. ते पुढे म्हणाले की, गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान हा केवळ त्यांच्या यशाचा गौरव नसून इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरतो. कठोर परिश्रम, चिकाटी आणि सातत्य यांच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, याचे उत्तम उदाहरण हे विद्यार्थी आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये अमर्याद क्षमता दडलेली असून योग्य मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे समर्पित प्रयत्न यांच्या माध्यमातून ती क्षमता अधिक प्रभावीपणे विकसित होवू शकते. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शैक्षणिक गुणवत्ताच नव्हे, तर नैतिक मूल्ये, सामाजिक जबाबदारी, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नाविन्यपूर्ण विचारसरणी यांचाही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात महत्त्वाचा वाटा आहे. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, शिस्त, जिज्ञासा आणि सकारात्मक दृष्टिकोन जोपासत समाजहिताची जाणीव ठेवून पुढे वाटचाल करावी, असे आवाहनही त्यांनी केले. पालक आणि शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या यशामागील खरे शिल्पकार आहेत. त्यांच्या अथक परिश्रमामुळेच विद्यार्थी यशाची नवी शिखरे गाठतात. त्यामुळे या यशामध्ये विद्यार्थ्यांसोबतच पालक आणि शिक्षकांचाही तितकाच मोठा वाटा आहे, असे त्यांनी नमूद केले. शेवटी त्यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे व शिक्षकांचे अभिनंदन करत भविष्यातही अशाच जिद्दीने आणि प्रामाणिक प्रयत्नांनी यश संपादन करुन आपल्या कुटुंबाचे, गावाचे, तालुक्याचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या.

या कार्यक्रमात केंद्रप्रमुख ज्ञानेश्वर आळणे, पालक डॉ.भानुदास गाडे, आदर्श शिक्षक रमेश धाईतिडक, श्रीमती.घुगे मॅडम तसेच गुणवंत विद्यार्थिनी समृध्दी सुधाकर मुंडे यांनीही मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना चिकाटी, मेहनत व आत्मविश्वासाच्या बळावर मोठे ध्येय गाठण्याचे आवाहन केले. याच कार्यक्रमात वडवणी तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या वतीने अध्यक्ष सुनिल मुंडे, सचिव प्रभाकर तिडके, संचालक गोरक्षनाथ मुंडे, बापू धनवे व रोहिदास चव्हाण यांच्या हस्ते गटविकास अधिकारी अशोक बाराखोते, गटशिक्षणाधिकारी राहुल भट्टी तसेच ज्ञानेश्वर आळणे, रामकिसन सांगळे, रणजीत शिंदे, अरुण शिंदे, कृष्णा शिंदे, नितीन डोंगरदिवे आणि प्रफुल्ल टकले या नवनिर्वाचित केंद्रप्रमुख व अधिकाऱ्यांचा स्वागत सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्रप्रमुख अरुण शिंदे यांनी केले. आदर्श शिक्षिका शिल्पा बडदे मॅडम यांनी प्रभावी, आकर्षक व दर्जेदार सूत्रसंचालन करुन कार्यक्रमाची रंगत वाढवली. शेवटी भिल्लारे सर यांनी उपस्थित मान्यवर, पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांचे आभार मानले. दरम्यान, वडवणी तालुक्यात प्रथमच जिल्हा परिषदेच्या शाळांतील लेकरांच्या कौतुकासाठी मोठ्या स्वरुपात आयोजित करण्यात आलेला हा गुणवंत गुणगौरव सोहळा विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान करणारा, पालक व शिक्षकांचा गौरव करणारा आणि शिक्षण क्षेत्राला नवी प्रेरणा देणारा ठरला. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण, प्रेरणादायी आणि भविष्याला दिशा देणारा वातावरणात संपन्न झाला.


cmyk

# बांबू लागवडीत राज्यात यवतमाळ पहिल्या क्रमांकावर

## दुसऱ्या क्रमांकावर पालघर तर अमरावती, वाशिम, अकोला हे जिल्हेही टॉपमध्ये

**पुणे । प्रतिनिधी**

**बांबू लागवडीत विदर्भाने महाराष्ट्रात मोठी झेप घेतली आहे. महाराष्ट्र बांबू विकास मंडळाच्या जून २०२६ मधील आकडेवारीनुसार, यवतमाळ जिल्हा राज्यात पहिल्या क्रमांकावर असून तब्बल ९,०३० शेतकऱ्यांनी ३२,३३४.३५ एकर क्षेत्रावर बांबूची लागवड केली आहे. यवतमाळनंतर दुसऱ्या स्थानी पालघरचा समावेश आहे. राज्यातील टॉप-१० मध्ये या जिल्ह्यांचा समावेश आहे.**



राज्यातील बांबू लागवडीमध्ये यवतमाळ जिल्हा अव्वल ठरला असून, अमरावती, वाशिम, अकोला आणि बुलढाणा या विदर्भातील जिल्ह्यांनीही राज्यातील आघाडीच्या दहा जिल्ह्यांमध्ये स्थान मिळविले आहे. त्यामुळे बांबू लागवडीत विदर्भाचा दबदबा निर्माण झाल्याचे महाराष्ट्र बांबू विकास मंडळाच्या जून २०२६ मधील आकडेवारीवरून स्पष्ट होते. बांबू लागवडीमुळे पर्यावरण संवर्धनाबरोबरच शेतकऱ्यांना उत्पन्नाचे पर्यायी साधन उपलब्ध होत आहे. त्यामुळे पारंपरिक पिकांसोबत बांबूची लागवड करण्याकडे विदर्भातील शेतकऱ्यांचा कल वाढत असल्याचे चित्र आहे. राष्ट्रीय बांबू अभियान आणि अटल बांबू समृद्धी योजनेंतर्गत मिळणाऱ्या प्रोत्साहनामुळे या लागवडीला आणखी चालना मिळत आहे. राष्ट्रीय बांबू अभियानांतर्गत राज्यात सर्वाधिक बांबू लागवड यवतमाळ जिल्ह्यात झाली आहे. जिल्ह्यात तब्बल ९,०३० शेतकऱ्यांनी ३२,३३४.३५ एकर क्षेत्रावर बांबूची लागवड केली आहे. राज्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत यवतमाळमधील लागवडीचे क्षेत्र मोठ्या फरकाने अधिक आहे. यवतमाळनंतर पालघरचा क्रमांक लागतो. पालघरमध्ये ३,८०१ शेतकऱ्यांनी १६,२५३.०९ एकर क्षेत्रावर बांबू लागवड केली आहे. तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या जालना जिल्ह्यात ३,३३६ शेतकऱ्यांनी १०,२४९.७७ एकर क्षेत्रावर लागवड केली आहे. राज्यातील बांबू लागवडीच्या आघाडीच्या दहा जिल्ह्यांमध्ये विदर्भातील तब्बल पाच जिल्ह्यांचा समावेश आहे. यवतमाळनंतर अमरावती, वाशिम, अकोला आणि बुलढाणा यांनीही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. अमरावती जिल्हा चौथ्या क्रमांकावर असून येथे ३,१७५ शेतकऱ्यांनी १०,२३६.१८ एकर क्षेत्रावर बांबू लागवड केली आहे. वाशिम सहाव्या क्रमांकावर असून १,५१३ शेतकऱ्यांनी ४,७६६.९६ एकर क्षेत्रावर बांबूची लागवड केली आहे. अकोला जिल्ह्यात १,११५ शेतकऱ्यांनी ३,६७४ एकर क्षेत्रावर बांबू लागवड केली असून जिल्ह्याचा आठवा क्रमांक आहे. तर बुलढाणा नवव्या क्रमांकावर असून ८७० शेतकऱ्यांनी २,७३६.२९ एकर क्षेत्रावर बांबू लागवड केली आहे. राज्यात बांबू लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाच्या विविध योजनांतर्गत शेतकऱ्यांना अनुदान, तांत्रिक मार्गदर्शन आणि प्रशिक्षण दिले जात आहे. राष्ट्रीय बांबू अभियान तसेच अटल बांबू समृद्धी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना लागवडीसाठी प्रोत्साहन मिळत असल्याने क्षेत्र वाढत आहे. विशेषतः विदर्भातील शेतकऱ्यांनी या योजनांचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. यवतमाळसारख्या जिल्ह्यात हजारो शेतकरी बांबू लागवडीकडे वळल्याने या पिकाची व्यावसायिक क्षमता अधोरेखित झाली आहे.

### पर्यावरणासह अर्थकारणालाही बळ

बांबूला 'हरित सोने' म्हणून ओळखले जाते. त्याची लागवड पर्यावरणाच्या दृष्टीने फायदेशीर मानली जाते. बांबू वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषून घेण्यास मदत करतो. त्यामुळे वाढते प्रदूषण आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर बांबू लागवडीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. दुसरीकडे, शेतकऱ्यांसाठीही बांबू हे दीर्घकालीन उत्पन्नाचे साधन ठरू शकते. पारंपरिक पिकांवरील हवामानाचा धोका, बाजारभावातील चढ-उतार आणि उत्पादन खर्चाचा विचार करता शेतकरी शेतीमध्ये विविधता आणण्यासाठी बांबू लागवडीचा पर्याय स्वीकारत आहेत.

### प्रक्रिया उद्योग उभे राहण्याची गरज

बांबू लागवडीचे क्षेत्र वाढत असले तरी त्यातून शेतकऱ्यांना अधिक चांगले उत्पन्न मिळण्यासाठी प्रक्रिया उद्योग आणि बाजारपेठेची साखळी मजबूत होणे आवश्यक आहे. बांबूपासून फर्निचर, घरगुती वस्तू, बांधकाम साहित्य, कागद, हस्तकला वस्तू तसेच बायोमाससारखी विविध उत्पादने तयार करता येतात. विदर्भात बांबूचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने स्थानिक पातळीवर प्रक्रिया केंद्रे, फर्निचर उद्योग आणि बायोमास प्रकल्प उभारल्यास शेतकऱ्यांना कच्च्या बांबूऐवजी प्रक्रिया केलेल्या उत्पादनातून अधिक मूल्य मिळू शकते. तसेच रोजगाराच्या नव्या संधीही निर्माण होऊ शकतात.

# आडसाली ऊस व्यवस्थापन



राज्यातील अनेक ऊस क्षेत्रांमध्ये सेंद्रिय कर्बाचे प्रमाण ०.५ टक्क्यांपेक्षाही कमी आहे. ही बाब चिंताजनक असून, जमिनीचे आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी सेंद्रिय खतांचा वापर अपरिहार्य बनला आहे. सेंद्रिय कर्ब हा जमिनीच्या सुपीकतेचा मुख्य आधार आहे. जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढविणे, माती भुसभुशीत ठेवणे, उपयुक्त सूक्ष्मजिवांची वाढ करणे, अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढविणे आणि रासायनिक खतांची कार्यक्षमता सुधारण्यामध्ये सेंद्रिय पदार्थांची महत्त्वाची भूमिका असते. आडसाली ऊस लागवडीपूर्वी प्रती एकर किमान १० टन चांगले कुजलेले शेणखत किंवा ५ टन कंपोस्ट खत वापरणे फायदेशीर ठरते. उपलब्धतेनुसार २ टन गांडूळ खत, २ टन कुजलेली प्रेसमड किंवा २ टन कोंबडी खताचाही वापर करता येतो. यासोबत ट्रायकोडर्मा, ॲझोटोबॅक्टर, पीएसबी आणि केएमबी यांसारखी जैविक खते सेंद्रिय खतामध्ये मिसळून वापरल्यास मातीतील उपयुक्त सूक्ष्मजिवांची संख्या वाढते आणि अन्नद्रव्यांचा कार्यक्षम वापर होतो. भुसभुशीत जमिनीत मुळांचा विस्तार जलद होतो. पाणी आणि हवा यांचा समतोल राखला जातो. अन्नद्रव्यांचे शोषण वाढते आणि सूक्ष्मजिवांची क्रियाशीलता सुधारते. त्यामुळे ऊस अधिक जोमाने वाढतो. उलट घट्ट झालेल्या जमिनीत मुळे उथळ राहतात. अशा परिस्थितीत उन्हाळ्यात पाण्याचा ताण लवकर जाणवतो आणि उत्पादनात घट होते.

**सऱ्या पाडताना नियोजन :**

अनेक शेतकरी सऱ्या पाडताना केवळ पारंपरिक पद्धतीचा अवलंब करतात. मात्र सऱ्यांचे अंतर, दिशा आणि खोली या तीन बाबी उत्पादनावर थेट परिणाम करतात.लागवडीपूर्वी जमीन समतल करून २० ते २५ सेंमी खोलीच्या सऱ्या पाडाव्यात. शक्यतो उत्तर-दक्षिण दिशेने सऱ्या घेतल्यास पिकाला दिवसभर समान सूर्यप्रकाश मिळतो. हलक्या जमिनीत ४.५ फूट, तर मध्यम ते भारी जमिनीत ५ फूट किंवा त्यापेक्षा अधिक अंतर ठेवणे अधिक फायदेशीर ठरते.


**योग्य वाणांची निवड आणि लागवड :**

बेण्यासाठी निवडलेला ऊस ८ ते १० महिन्यांचा, रोगमुक्त, कीडमुक्त, सरळ, सशक्त आणि पूर्ण विकसित डोळे असलेला असावा. काळपट, सुकलेले किंवा रोगग्रस्त डोळे असलेले बेणे टाळावे. खोडव्याचा ऊस बेण्यासाठी वापरणे योग्य नाही. महाराष्ट्रासाठी शिफारस केलेल्या को. ८६०३२, व्हीएसआय ०८००५, कोएम ०२६५, कोव्हीएसआय ९८०५, पीडीएन १५०१२ आणि पीडीएन १३००७ या जाती विविध जमिनींसाठी आणि हवामानासाठी उपयुक्त ठरल्या आहेत.

**पीक व्यवस्थापन :**

ऊस लागवडीनंतर पहिल्या ९० ते १२० दिवसांच्या कालावधीत तणांचा प्रादुर्भाव सर्वाधिक होतो. याच काळात तणांनी अन्नद्रव्ये, पाणी आणि सूर्यप्रकाशावर ताबा मिळविल्यास ऊसाची वाढ खुंटते. बेणे जास्त वयाचे असल्यास, लागण करताना खाली दबले गेले असल्यास, कांड्या पाण्याबरोबर वाहून जाऊन उघड्या पडल्या असल्यास उगवण आणि संख्येवर त्याचा परिणाम होतो. नांग्या भरण्यासाठी पाण्याच्या पाटात, कटाच्या शेजारी जास्त टिपरी लावून त्याचा वापर नांग्या भरण्यासाठी करावा. अथवा लागणी अगोदर १५ दिवस प्लास्टिकच्या पिशवीत एक डोळा पद्धतीने रोपे तयार करावीत. रोप १ ते १. ५ महिन्याचे झाल्यावर त्याचा नांग्या भरण्यासाठी वापर करावा. नांग्या भरण्याचे काम एक महिन्यातच पूर्ण करावे. म्हणजे प्रति हेक्टरी अपेक्षित पक्व उसाची संख्या वाढून उत्पादन वाढण्यास मदत होते. लागवडीनंतर साधारण ४५ ते ६० दिवसांनी बाळबांधणी करणे आवश्यक आहे. या वेळी माती हलकी करून मुळांना हवा मिळेल अशी परिस्थिती निर्माण केली जाते. त्यामुळे नवीन मुळांची वाढ वेगाने होते आणि अन्नद्रव्यांचे शोषण सुधारते. लागवडीनंतर सुमारे १२० दिवसांनी मोठी बांधणी करावी. या प्रक्रियेमध्ये बुंध्याजवळ माती चढवली जाते. त्यामुळे भक्कम आधार मिळतो, लोळण्याचे प्रमाण कमी होते, मुळांची वाढ वाढते आणि खतांचा उपयोग अधिक कार्यक्षमतेने होतो. पावसाळ्यात जोरदार वारे असलेल्या भागात मोठी बांधणी विशेषतः उपयुक्त ठरते.

# शेतकऱ्यांना परदेश दौऱ्याची सुवर्णसंधी!
## मिळवा २ लाखांपर्यंत अनुदान



**पुणे । प्रतिनिधी**

**''राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे (सन २०२६-२७)'' या योजनेअंतर्गत आता महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना युरोप आणि चीनसारख्या देशांमध्ये जाऊन तेथील शेतीचा अभ्यास करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करून शेतीत नवकल्पना, उत्पादन व उत्पन्न वृद्धी हेच लक्ष्य! हे या योजनेचे मुख्य ब्रीदवाक्य आहे.**

**अभ्यास दौऱ्याची मुख्य उद्दिष्टे :**

शेतकऱ्यांना केवळ परदेशात नेणे हा या योजनेचा हेतू नसून, तेथील तंत्रज्ञान महाराष्ट्राच्या मातीत रुजवणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अभ्यास करणे. शेतीतील उत्पादन आणि उत्पादित मालाच्या गुणवत्तेत भरघोस वाढ करणे. कृषी प्रक्रिया आणि बाजार व्यवस्थापनाचे जागतिक तंत्र समजून घेणे. कृषी यांत्रिकीकरण आणि शेतीतील नवकल्पनांना चालना देणे. निर्यातक्षम आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देणे.

**अभ्यास दौऱ्यासाठी प्रस्तावित देश आणि विषय:**

यावर्षीच्या दौऱ्यासाठी दोन प्रमुख देशांची निवड करण्यात आली आहे, जिथे शेतकरी विविध विषयांवर मार्गदर्शन घेतील. युरोपमध्ये प्रामुख्याने फलोत्पादन, संरक्षित शेती (उदा. पॉलीहाऊस, ग्रीनहाऊस) आणि दुग्धोत्पादन या विषयांवर विशेष अभ्यास दौरा आयोजित केला जाईल. चीनच्या दौऱ्यामध्ये विविध आधुनिक कृषी तंत्रज्ञान, पीक उत्पादकता वाढीचे तंत्रज्ञान आणि भव्य कृषी  ला भेट देण्याचे नियोजन असेल.

**अनुदानाचा तपशील :**


या योजनेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे शासनाकडून मिळणारे भक्कम आर्थिक पाठबळ. शेतकऱ्यांना या दौरा खर्चाच्या ५०% किंवा कमाल रु. २.०० लाख (यापैकी जी रक्कम कमी असेल ती) अनुदान म्हणून दिली जाईल. यामुळे सर्वसामान्य आणि प्रगतशील शेतकऱ्यांना परदेश दौऱ्याचा मोठा आर्थिक भार उचलावा लागणार नाही.

**योजनेसाठी पात्रता अटी :**

या दौऱ्यात सहभागी होण्यासाठी कृषी विभागाने काही महत्त्वाच्या अटी निश्चित केल्या आहेत. अर्जदार शेतकऱ्याने खालील अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे: शेतकऱ्याकडे ॲग्रीस्टॅक आयडी असणे अनिवार्य आहे. अर्जदाराकडे स्वतःचा वैध पासपोर्ट असणे अत्यंत आवश्यक आहे. अर्जदार हा स्वतः शेतकरी असावा. तो कोणत्याही शासकीय किंवा खाजगी नोकरीत नसावा. शेतकऱ्याचे वय २५ वर्षे पूर्ण असावे. परदेश दौऱ्यासाठी शेतकरी वैद्यकीयदृष्ट्या तंदुरुस्त असणे आवश्यक आहे. यापूर्वी कोणत्याही शासकीय अनुदानाने परदेश दौरा न केलेला शेतकरीच या योजनेस पात्र ठरेल. आपली शेती जागतिक स्तरावर नेण्याची आणि प्रगत राष्ट्रांमधील शेतीचे तंत्र जवळून अनुभवण्याची ही एक उत्तम संधी आहे. जर तुम्ही वरील सर्व पात्रतेच्या अटी पूर्ण करत असाल, तर या योजनेचा लाभ नक्की घ्या. अधिक माहितीसाठी आणि अर्ज प्रक्रियेसाठी आपल्या जवळच्या तालुका किंवा जिल्हा कृषी कार्यालयाशी त्वरित संपर्क साधा.

# अल्पाईन जातीची शेळी दिवसाला देते ५ लिटर दूध

**शेळीपालन असा व्यवसाय आहे तो कमीत कमी जागेमध्ये सुरू करता येतो आणि खर्च देखील इतर व्यवसायांच्या तुलनेत खूप कमी लागतो. या व्यवसायात देखील आता अनेक प्रकारचे तंत्रज्ञान आल्यामुळे अनेक सुशिक्षित तरुण आता या व्यवसायाकडे वळत असून व्यावसायिक दृष्टिकोनातून हा व्यवसाय आता मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. शेळीपालनासाठी शेळ्यांच्या जातींची निवड यावर देखील तुमच्या व्यवसायाचे यशाचे गणित ठरलेले असते. दर्जेदार आणि जातिवंत अशा जातींची निवड शेळीपालनासाठी करणे खूप गरजेचे असते.**



**जातिवंत शेळ्यांची निवड :**

शेळीपालन हा शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत बनत आहे. इतर गुरांच्या तुलनेत त्यांच्या संगोपनात हानी होण्याची शक्यताही कमी असते. अशा स्थितीत पशुपालकांनी उत्तम जातीच्या शेळ्यांची निवड करून संगोपन सुरू केल्यास नफ्यात आणखी वाढ होऊ शकते. शेळ्यांच्या अनेक जाती आहेत ज्यांचे पालन शेतकरी किंवा व्यावसायिक करतात.

**अल्पाइन जातीची शेळी :**

अल्पाइन शेळी जातीची उत्पत्ती स्वित्झर्लंडमध्ये झाली आहे. अल्पाइन प्राण्यांच्या दुधात चरबीचे प्रमाण ६ टक्के आहे. आणि एकूण वार्षिक दूध उत्पादन १.६ टन आहे. जे न्युबियन शेळ्यांपेक्षा खूप जास्त आहे. हा विक्रम युनायटेड स्टेट्समध्ये सेट केला गेला होता. प्रति कॅलेंडर वर्षात २.२ टन दुधाचे सूचक प्राप्त करणे शक्य होते.

**दिवसाला किती लिटर देते दूध ?**

अल्पाइन शेळी सरासरी दिवसाला ५ लिटरपेक्षा जास्त दूध देते. अर्थातच, योग्य काळजी आणि चांगल्या पोषणामुळे उत्पादकतेमध्ये अल्पाइन शेळ्या सॅनेन शेळ्यांपेक्षा कमी दर्जाच्या नसतात. त्याच्या नाजूक मलईदार चवीने दूध घरगुती कॉटेज चीज आणि कॉटेज चीज बनवण्यासाठी आधार म्हणून काम करते.

**अल्पाइन जातीच्या शेळीचे वैशिष्ट्ये:**

अल्पाइन शेळीच्या जातीचे एक विशिष्ट वैशिष्ट्य म्हणजे अष्टपैलुत्व. ते उत्पादकतेच्या बाबतीत आघाडीवर आहेत. तर अल्पाइन शेळ्यांच्या दुधाला एक अनोखी विषेश चव असते. याशिवाय, शेळी अत्यंत सुपीक आणि इतर जातींसह पार करण्यासाठी आदर्श आहे, ज्यामुळे त्यांची उत्पादकता, दुधाचे उत्पन्न आणि दुधात चरबीचे प्रमाण वाढते.

## दिन विशेष

### जागतिक दिवस:
### भारत छोडो दिवस, भारतीय ग्रंथालय दिन
### आंतरराष्ट्रीय भूमिपूत्र दिन

### महत्वाच्या घटना

११७३ : पिसाच्या मनोऱ्याचे बांधकाम सुरू झाले. हा मनोरा बांधण्यास २०० वर्षे लागली आणि चुकीने तो तिरका बांधला गेला.
१८९२ : थॉमस एडिसन यांना दुहेरी तार यंत्राचे पटेंट मिळाले.
१९२५ : चंद्रशेखर आझाद आणि त्यांच्या सहकार्यांनी काकोरी रेल्वेस्थानकावर सरकारी खजिना लुटला.
१९४२ : 'चले जाव' चा नारा दिल्याबद्दल महात्मा गांधींना अटक करण्यात आली.
१९४५ : अमेरिकेने जपानच्या नागासाकी शहरावर 'फॅटबॉय' हा अणूबॉम्ब टाकला. यात ३९,००० लोक तत्क्षणी म्रुत्यूमुखी पडले तर हजारो लोकांना पुढील अनेक वर्षे किरणोत्सर्गाचे परिणाम भोगावे लागले. प्रथम हिरोशिमा व नंतर नागासाकी या शहरांवर टाकलेल्या अणूबॉम्बमुळे जपानने शरणागती पत्करली आणि दुसरे महायुद्ध संपुष्टात आले.
१९६५ : मलेशियातुन बाहेर काढल्यामुळे सिंगापूर हा देश स्वतंत्र झाला. आपल्या इच्छेविरुद्ध स्वतंत्र झालेला हा जगातील एकमेव देश आहे.
१९७४ : वॉटरगेट प्रकरण  अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी राजीनामा दिला.
१९९३ : छोडो भारत चळवळीच्या सुवर्णजयंती सांगतासमारंभानिमित्ताने 'सरहद गांधी' खान अब्दुल गफार खान यांच्या टपाल तिकिटाचे प्रकाशन
१९९३ : छोडो भारत चळवळीच्या सुवर्णजयंती सांगतासमारंभानिमित्ताने 'सरहद गांधी' खान अब्दुल गफार खान यांच्या टपाल तिकिटाचे प्रकाशन
१९७५ : पंतप्रधानांच्या विरुध्द कोर्टात जाण्यास मनाई करणारे विधेयक संसदेत मंजूर करण्यात आले. या वेळी बरेच विरोधी पक्षनेते तुरुंगात होते.
१९९३ : छोडो भारत चळवळीच्या सुवर्णजयंती सांगतासमारंभानिमित्ताने 'सरहद गांधी' खान अब्दुल गफार खान यांच्या टपाल तिकिटाचे प्रकाशन
१९९६ : पद्मभूषण व पद्मश्री पुरस्कार तसचं, भारतरत्न पुरस्कार सन्मानित जगप्रसिद्ध भारतीय क्रिकेटपटू मास्टर ब्लास्टर सचिन तेंडूलकर यांची भारतीय क्रिकेट संघाच्या कर्णधार पदी नियुक्ती करण्यात आली.
२००० : भाभा अणूसंशोधन केन्द्राचे संचालक डॉ. अनिल काकोडकर यांना दिल्ली येथील 'इन्स्टिट्युट ऑफ इंडस्ट्रियल रिसर्च' या संस्थेचा सुवर्णमहोत्सवी गौरव पुरस्कार जाहीर
२००५ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाचे डिस्कव्हरी हे मानवरहित अंतराळ यान चौदा दिवसांच्या साहसी आणि धोकादायक प्रवासानंतर कॅलिफोर्नियास्थित एअरबेसवर सुरक्षितपणे उतरले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६३१ : इंग्लंड देशांतील पहिले कवी पुरस्कार विजेते इंग्रज कवी, साहित्यिक समीक्षक, अनुवादक आणि नाटककार जॉन ड्राइडन यांचा जन्मदिन.
१७५४ : पिअर चार्ल्स एल्फांट  वॉशिंग्टन शहराचे रचनाकार फ्रेन्च अमेरिकन वास्तुविशारद आणि स्थापत्य अभियंता (मृत्यू: १४ जून १८२५)
१७७६ : ॲमेडीओ ॲव्होगॅड्रो  इटालियन रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: ९ जुलै १८५६)
१८७६ : ब्रिटीश कालीन भारतातील बंगाल प्रांताचे गव्हर्नर लॉर्ड लिटन द्वितीय ( -, २) यांचा जन्मदिन.
१८९० : 'संगीतसूर्य' केशवराव भोसले  'संगीत सौभद्र' मधील धैर्यधराच्या भूमिकेत गाजलेले गायक अभिनेते. 'हाच मुलाचा बाप', 'सन्याशाच्या मुलगा' या नाटकांतील त्यांच्या भूमिका गाजल्या. त्यांनी स्थापन केलेल्या ललितकलादर्श संगीत नाटक मंडळींतर्फे 'सौभद्र', 'शारदा', 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' इ. अनेक नाटके रंगभूमीवर आली. (मृत्यू: ४ आक्टोबर १९२१)
१८९१ : सयुक्त प्रांताचे माजी राज्यपाल फ्रान्सिस वर्नर वाईली यांचा जन्मदिन.
१८९३ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय हिंदी कादंबरीकार, संपादक आणि गद्य लेखक शिवपूजन सहाय यांचा जन्मदिन.
१९०९ : डॉ. विनायक कृष्ण गोकाक  ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कन्नड साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ व इंग्रजी वाङ्मयाचे गाढे अभ्यासक (मृत्यू: २८ एप्रिल १९९२)
१९२० : कृ. ब. निकुम्ब  'घाल घाल पिंगा वार्या, माझ्या परसात' या कवितेमुळे परिचित असलेले भावकवी. त्यांचे अनेक कवितासंग्रह व 'सायसाखर' हे खंडकाव्य प्रसिद्ध आहे. (मृत्यू:)
१९३३ : साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय हिंदी लेखक, पत्रकार आणि पटकथा लेखक व कादंबरीकार मनोहर श्याम जोशी यांचा जन्मदिन.
१९३७ : मॉरिशस येथील पसिद्ध भारतीय हिंदी साहित्यकार अभिमन्यू अनंत यांचा जन्मदिन.
१९७५ : भारतीय अभिनेते आणि निर्माते महेश बाबू यांचा जन्म.
१९९१ : हंसिका मोटवानी  अभिनेत्री व मॉडेल

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०१ : विष्णूदास अमृत भावे  मराठी रंगभुमीचे जनक, त्यांची पन्नासहून अधिक नाट्याख्याने 'नाट्यकवितासंग्रह' या नावाने प्रसिद्ध झाली आहेत. (जन्म: ? ? १८१९)
१९४८ : हुगो बॉस कानी चे संस्थापक हुगो बॉस यांचे निधन. (जन्म: ८ जुलै १८८५)
१९६२ : नोबल पारितोषिक पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध जर्मन स्विस कवी, कादंबरीकार आणि चित्रकार हर्मन कार्ल हेसे यांचे निधन.
१९७० : ब्रिटीश कालीन भारतात तीस वर्ष तुरुंगवास भोगणारे प्रख्यात भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ते व राजकारणी त्रिलोकनाथ चक्रवर्ती यांचे निधन.
१९७६ : जान निसार अख्तर  ऊर्दू शायर व गीतकार (जन्म: १४ फेब्रुवारी १९१४)
१९९६ : जेट इंजिन चे शोधक फ्रँक व्हाटलेट यांचे निधन. (जन्म: १ जुन १९०७)
२००२ : शांताबाई दाणी  ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायी (जन्म: १ जानेवारी १९१८)
२०१५ : भारतीय पत्रकार, लेखक, आणि कवी काययार सिंहनाथ राय यांचे निधन. (जन्म: ८ जून १९१५)



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# पाथर्डीत आरटीओच्या भ्रष्ट कारभाराचे बिंग फुटल्याचे लक्षात आल्याने पत्रकार पठाण यांच्यावर खोटा गुन्हा ?

## अवैध वाळू माफियांचे ओव्हरलोड डंपर मोकाट, शेतीमालवाहतूक वाहने अडवून नियमबाह्य दंड

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यात प्रादेशिक परिवहन विभागाच्या वायूवेग पथकाचा मनमानी आणि पक्षपाती कारभार अत्यंत टोकाला पोहोचला आहे. रस्त्यांवरून दिवस-रात्र राजरोसपणे धावणारे ओव्हरलोड डंपर, हायवा सिमेंट, अवैध वाळू आणि लोखंडाची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या बड्या माफियांच्या गाड्यांकडे सोयीस्कर डोळेझाक करायची आणि दुसरीकडे रात्रीच्या अंधारात कांदा व शेतमाल वाहून नेणारे टेम्पो ट्रॅक्टर आणि भाडेतत्त्वावर चालणाऱ्या रिक्षांना अडवून त्यांच्यावर कारवायांचा बडगा उचलायचा, असा एकतर्फी धंदा आरटीओ अधिकाऱ्यांनी मांडला आहे. प्रशासनाच्या या अन्यायकारक धोरणाविरोधात पत्रकार शन्नो पठाण थेट बोट ठेवले असता स्वतःचे पितळ उघडे पडण्याच्या भीतीपोटी आरटीओ अधिकाऱ्यांनी खोटा गुन्हा दाखल करून पत्रकाराचा आवाज दाबण्याचा केविलवाणा प्रयत्न केला असल्याची चर्चा येथे होत आहे.

दंडाची पावती हातावर टेकवली मग शासकीय कामात अडथळा कसा? हा सगळा प्रकार माणिकदौंडी रस्त्यावर नव्हे तर पाथर्डी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात घडला. ज्या शेतीमाल वाहून नेणाऱ्या टेम्पोसाठी पत्रकाराने व्हिडिओ काढला होता, त्या ड्रायव्हरला आरटीओ अधिकाऱ्यांनी ऑनलाईन दंडाची पावती/चलन यादी हातावर टेकवून आपली कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली होती. आरटीओ अधिकाऱ्यांना चलनाची पावती फाडताना कोणीही अडवले नाही. त्यांच्या कामात प्रत्यक्ष कोणताही अटकाव केला नाही. अधिकाऱ्यांनी त्यांची दंडात्मक कागदपत्रे ड्रायव्हरच्या स्वाधीन करून आपली कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली होती. सत्य दडपण्यासाठी फेसबूकवरील व्हिडिओ तक्रार करून डिलीट मारण्यात आला. आरटीओचा हा सगळा कारभार आणि त्यांचा पक्षपातीपणा उघडा पडू नये म्हणून अधिकाऱ्यांनी केवळ खोटा गुन्हाच दाखल केला नाही तर फेसबूकवर पोस्ट केलेला व्हिडिओ सोशल मीडिया प्लॅटफॉर्मकडे तक्रार करून डिलीट करायला लावला. सत्य जनतेसमोर येऊ नये आणि आरटीओ प्रशासनाचा बुरखा फाटू नये यासाठीच हा व्हिडिओ डिलीट मारण्याचा खटाटोप करण्यात आला आहे.

### खोट्या गुन्ह्याला घाबरणार नाही

बड्या वाहनांकडून होणाऱ्या वाहतुकीवर डोळेझाक करायची आणि केवळ शेतमालाची वाहतूक करणाऱ्या लहान वाहनांना रात्रीच्या वेळी गाठून दंडाच्या पावत्या फाडायचा हा कारभार कशासाठी. धोरणाविरोधात आरटीओ अधिकाऱ्यांनी कितीही गुन्हे दाखल केले किंवा दडपशाहीचा वापर करून व्हिडिओ डिलीट केले तरी मागे हटणार नाही, असे पत्रकार शन्नो पठाण यांनी सांगितले.

### प्रेस क्लब गृहमंत्रालयाकडे दाद मागणार

गोरगरीब जनतेच्या अन्याय अत्याचाराच्या शासनाच्या निधीचा दुरुपयोग करत विविध शासकीय विभागात होत असलेली बेकायदेशीर कामांच्या विरोधात पत्रकार विविध वृत्तपत्र व वृत्तवाहिन्या यांच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी शासन व प्रशासनाचे लक्ष वेधत असतात. परंतु लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असलेल्या पत्रकारावरच खोटे गुन्हे दाखल होत असल्याने पत्रकारांनी सत्यता मांडायची की नाही. लोकशाहीची गळचेपी करण्याचे काम काही ठराविक दलालांकडून होत असल्याने, या दडपशाहीविरुद्ध व पत्रकार शन्नो पठाण यांच्यावरील खोट्या गुन्ह्याचा निषेध नोंदवत भगवानगड परिसर प्रेस क्लब, पाथर्डी पोलीस व एसपी अहिल्यानगर व गृहमंत्रालयाकडे दाद मागणार आहे.

– प्रा.दादासाहेब खेडकर
(अध्यक्ष-भगवानगड परिसर प्रेस क्लब खरवंडी कासार).

# आज पासून जिल्ह्यात 'हर घर तिरंगा' अभियान

जालना । प्रतिनिधी

जिल्ह्यात ९ ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व शासकीय – निमशासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था तसेच स्वयंसेवी संघटना यांच्या समन्वयाने या अभियाना अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे.




या अभियानादरम्यान प्रत्येक घरावर राष्ट्रध्वज फडकविणे, नागरिकांमध्ये राष्ट्रप्रेम व देशभक्तीची भावना जागृत करणे तसेच विविध जनजागृती कार्यक्रमांचे प्रभावी नियोजन करण्यात येणार आहे. यावेळी शासकीय कार्यालये, ग्रामपंचायती, नगरपालिका, शाळा-महाविद्यालये तसेच विविध सार्वजनिक ठिकाणी राष्ट्रध्वज फडकविणे, प्रभात फेऱ्या, तिरंगा रॅली, देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम, जनजागृती अभियान आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यापक प्रचार-प्रसार करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सर्व संबंधित विभागप्रमुखांना अभियान कालावधीत नियोजित उपक्रम वेळेत व प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना देत नागरिकांनीही मोठ्या उत्साहाने 'हर घर तिरंगा' अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले.

# भक्तीमुळे जगाकडे पाहण्याची दृष्टीच बदलते - विशाल महाराज खोले

मंठा । प्रतिनिधी

विठ्ठल परमात्म्याचे अस्तित्व सर्वत्र व्यापून आहे,विठ्ठलाचे मुखाने नाम घेत, त्याच्या भक्तीमध्ये आनंदाने नाचत राहिले पाहिजे. भक्ती मनात जागी झाली की जगाकडे पाहण्याची दृष्टीच बदलते असे प्रतिपादन ह.भ.प. विशाल महाराज खोले यांनी मंठा येथे आयोजित कीर्तन सोहळ्यात केले.




याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख ए.जे. पाटील बोराडे यांनी कीर्तनकार ह.भ. प. विशाल महाराज खोले यांचे स्वागत केले. यावेळी तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे, भागवत कथा यजमान अशोक मुळे, हभप सर्वश्री अंकुश महाराज झोल, तुकाराम महाराज बाहेकर, रामेश्वर महाराज नालेगावकर, किसनराव मोरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यानिमित्त येथील गणेश मंगल कार्यालयात कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संत तुकाराम महाराज यांच्या *गाऊ नाचू विठू तुझा करू अनुवाद, जिकडे पाहावे तिकडे सर्वमय गोविंद* या अभंगावर निरूपण करताना हभप विशाल महाराज खोले म्हणाले की, भक्ती ही केवळ मनात ठेवण्याची गोष्ट नसून ती गाण्यात, नाचण्यात आणि आनंदाने जगण्यातून व्यक्त झाली पाहिजे. तुकाराम महाराजांचा भक्तीमार्ग आपल्याला देव बाहेर शोधण्यापेक्षा आत शोधला पाहिजे असे सांगतो. परमेश्वर आनंद स्वरूप असल्यामुळे त्याची भक्ती करताना आपणही आनंदमय होऊन जातो. शेवटी पिंगळा गाऊन विशाल महाराज यांनी उपस्थित भाविकांची मने जिंकली. यावेळी हभप अंशीराम महाराज चव्हाळ, तुकाराम महाराज पारधे, गायनाचार्य शिवाजी महाराज काकडे, मृदंगाचार्य कृष्णा महाराज कदम, शाम महाराज श्रावणे, भाऊसाहेब महाराज खरात ,पद्माकर बुवा पेवेकर, बळीराम महाराज बोडखे, विठ्ठल महाराज नरवडे, निवृत्ती महाराज कांगणे आदी उपस्थित होते. कीर्तनासाठी मंठा पंचक्रोशीतील भाविकांची मोठी उपस्थिती होती. शनिवारी (ता. ८ ) भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याची महाप्रसादाने सांगता झाली. या श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञ व किर्तन सोहळ्यामध्ये समस्त ग्रामस्थ मंडळी सहभागी झाले होते.

# उद्घाटनाच्या प्रतीक्षेत पाथर्डी पोलिस वसाहत कर्मचाऱ्यांना अजून भाड्याच्या घरांचा आधार

**पाथर्डी । प्रतिनिधी**

**पाथर्डी शहरात राज्य गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत सुमारे २३ कोटी ८१ लाख रुपये खर्चून उभारण्यात आलेली, अत्याधुनिक पोलिस ठाणे व पोलिस कर्मचारी वसाहतीची इमारत गेल्या आठ महिन्यांपासून उद्घाटनाच्या प्रतीक्षेत आहे. इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊनही पोलिस कर्मचाऱ्यांना अद्याप निवासस्थाने उपलब्ध न झाल्याने त्यांना भाड्याच्या घरांमध्ये राहावे लागत असून त्यामुळे अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत आहे.**

नवीन संकुलात पोलिस ठाण्यासह चार निवासी इमारतींमध्ये ४८ निवासस्थाने तसेच दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र निवासस्थाने उभारण्यात आली आहेत नवीन पोलिस ठाण्यातून कामकाज सुरू झाले असले तरी पोलिस वसाहतीचा वापर अद्याप सुरू झालेला नाही. परिणामी कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेली ही सुविधा वापराविना पडून आहे. सूत्रांच्या माहितीनुसार बांधकाम पूर्ण झाले असले तरी संबंधित ठेकेदाराकडून प्रकल्पाचे औपचारिक हस्तांतरण प्रशासनाकडे अद्याप झालेले नाही त्यामुळे उद्घाटन आणि ताबा हस्तांतरणाची प्रक्रिया रखडली आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री व भाजप नेत्या पंकजा मुंडे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन करण्याच्या प्रतीक्षेमुळेही विलंब होत असल्याची चर्चा शहरात सुरू आहे. या प्रकल्पासाठी आमदार मोनिका राजळे यांनी गेल्या पाच वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करून निधी मंजूर करून घेतला होता. सन २०२३ मध्ये खासदार सुजय विखे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले होते. मागील वर्षी नोव्हेंबरमध्ये पोलीस वसाहतीचे काम पूर्ण झाल्यानंतरही आठ महिने उलटून गेले तरी पोलिस कर्मचाऱ्यांना निवासस्थाने मिळालेली नाहीत. दरम्यान, जुनी पोलिस वसाहत मोडकळीस आल्याने तेथील घरे राहण्यायोग्य राहिली नव्हती, इमारती धोकादायक झाल्याने ती रिकामी करण्यात आली. त्यामुळे अनेक पोलिस कर्मचाऱ्यांना भाड्याच्या घरांमध्ये राहण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. कोट्यवधी रुपयांचा निधी खर्चून उभारलेली सुविधा वापराविना पडून असल्याने, हा विलंब व होत असल्या दिरंगाईमुळे तसेच प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे की उद्घाटनाच्या राजकारणामुळे असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. पोलिस कर्मचाऱ्यांना तातडीने नवीन निवासस्थाने उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने प्रलंबित प्रक्रिया त्वरीत पूर्ण करावी, अशी मागणी होत आहे.

# जलसंधारणाच्या कार्याची दखल; भाऊसाहेब घुगे यांना 'जलक्रांती योद्धा' पुरस्कार

जालना । प्रतिनिधी

जिल्ह्यात जलसंधारण, नदी-नाला खोलीकरण व रुंदीकरण, जलसाठा निर्मिती तसेच वृक्षलागवडीच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख तथा नाम फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक आणि नाथ फाउंडेशनचे अध्यक्ष भाऊसाहेब घुगे यांना 'जलक्रांती योद्धा' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




छत्रपती संभाजीनगर येथील मंगलम रिसॉर्ट, गंगापूर रोड येथे आयोजित पुरस्कार सोहळ्यात कॅबिनेट मंत्री अतुलजी सावे यांच्या हस्ते भाऊसाहेब घुगे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी माजी केंद्रीय मंत्री भागवतजी कराड, आमदार बबनराव लोणीकर, आमदार प्रशांत बंब, आमदार प्रकाश सोळंके, लोकशाहीचे संपादक विशाल पाटील, अँकर करण सिंह पवार, अँकर लागवी ओम सावंत, सुधाकर जाधव यांच्यासह भाऊसाहेब घुगे यांचे सहकारी प्रवीण फुके पाटील, राजीव पाटील, वायाळ, रामेश्वर दराडे आदी मान्यवर उपस्थित होते.

भाऊसाहेब घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली नाम फाउंडेशन व नाथ फाउंडेशनच्या माध्यमातून जालना जिल्ह्यातील विविध गावांमध्ये नदी-नाले खोलीकरण व रुंदीकरणाची कामे करण्यात आली आहेत. विशेषतः भोर्डी नदीच्या पुनर्जीवनामुळे परिसरातील शेतीसह पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात जलसाठा उपलब्ध होण्यास मदत झाली आहे. या कामांमुळे गावांच्या पाणी उपलब्धतेत सकारात्मक बदल झाला असून शेतीला चालना मिळण्याबरोबरच भूजल पातळीतही सुधारणा झाली आहे. जलसंधारणाबरोबरच मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करून त्यांचे संगोपन करण्याचे कामही करण्यात आले आहे. जलसंधारण आणि पर्यावरण संवर्धनाच्या माध्यमातून समाजहितासाठी केलेल्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत भाऊसाहेब घुगे यांचा 'जलक्रांती योद्धा' पुरस्काराने गौरव करण्यात आला.

# मांजरा साखर कारखान्यास डेक्कन शुगरचा बेस्ट शुगर फॅक्टरी पुरस्कार

लातूर । प्रतिनिधी

लातूर येथील विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा सहकारी साखर कारखान्याला द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन इंडिया, पुणे यांच्या वतीने दिला जाणारा बेस्ट शुगर फॅक्टरी २०२६ विशेष पुरस्कार जाहीर झाला आहे. कारखान्याने सलग तीन वर्षे शंभर टक्के ऊसतोड केवळ हार्वेस्टरद्वारे करून देशात नवा आदर्श निर्माण केल्याबद्दल हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे.

या पुरस्काराचे वितरण ८ ऑगस्ट २०२६ रोजी पुणे येथील हटिल जे. डब्ल्यू. मेरियट येथे आयोजित ७१ व्या वार्षिक परिषद व शुगर एक्स्पो इंडिया २०२६ कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. मजुरांची कमतरता, वाढलेले ऊसक्षेत्र आणि विलंबाने होणारी ऊसतोड यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून कारखान्याचे अध्यक्ष तथा राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी हार्वेस्टरद्वारे ऊसतोडीचा अभिनव उपक्रम राबविला. जिल्हा बँकेच्या सहकार्याने कार्यक्षेत्रातील सभासद व होतकरू तरुणांना हार्वेस्टर उपलब्ध करून देण्यात आले. त्यानंतर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धीरज देशमुख यांनी हार्वेस्टर खरेदीसाठी विशेष कर्जयोजना सुरू केली. या योजनेचा लाभ घेत अनेक शेतकऱ्यांनी स्वतःचे हार्वेस्टर खरेदी करून ते कारखान्यास भाडेतत्त्वावर उपलब्ध करून दिले. सध्या मांजरा साखर कारखान्याकडे स्वतःचे २५ हार्वेस्टर असून, कारखान्याच्या हमीवर उपलब्ध करून दिलेले ५५ हार्वेस्टर अशा एकूण ८० हार्वेस्टरच्या माध्यमातून २०२५-२६ च्या गाळप हंगामात शंभर टक्के ऊसतोड करण्यात आली. त्यामुळे १०० टक्के हार्वेस्टरद्वारे ऊसतोड करणारा देशातील पहिला साखर कारखाना म्हणून मांजरा साखर कारखान्याची नोंद झाली आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जाहीर झालेल्या बेस्ट शुगर फॅक्टरी २०२६ विशेष पुरस्कारामुळे राज्यभरातून मांजरा साखर कारखान्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# दुचाकी दुभाजकाला धडकली; वाढदिवशीच तरुणावर काळाचा घाला

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

कन्नड तालुक्यातील हतनूर येथील राष्ट्रीय महामार्गावर जिल्हा परिषद शाळेजवळ उड्डाणपुलाच्या



सुरुवातीला दुचाकी दुभाजकाला धडकून झालेल्या भीषण अपघातात साईराज योगेश बिडवे (वय २०) या महाविद्यालयीन तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी रात्री घडली. विशेष म्हणजे, ७ ऑगस्ट रोजीच साईराजचा वाढदिवस होता. वाढदिवसाच्या आनंदाला दुसऱ्याच दिवशी झालेल्या या दुर्घटनेने गालबोट लागले असून, बिडवे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. हतनूरसह पंचक्रोशीत या घटनेने हळहळ व्यक्त होत आहे.


साईराज हा कन्नडहून दुचाकीवरून हतनूरकडे येत होता. रात्रीच्या वेळी उड्डाणपुलाच्या सुरुवातीला गावाकडे जाणाऱ्या रस्त्याचा अंदाज न आल्याने त्याची दुचाकी थेट दुभाजकाला धडकली. या धडकेत त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि तो रस्त्यावर कोसळला. अपघाताची माहिती मिळताच नातेवाइक आणि मित्रांनी घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी अवस्थेतील साईराजला तातडीने छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. साईराजवर ८ ऑगस्ट रोजी हतनूर येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. साईराज महाविद्यालयीन शिक्षणाच्या द्वितीय वर्षात शिकत होता. सामाजिक कार्यकर्ते योगेश पांडुरंग बिडवे यांचा तो एकुलता एक मुलगा होता. त्याच्या पश्चात आई-वडील, आजी आणि एक बहीण असा परिवार आहे. हतनूर येथील राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपुलावरील पथदिवे गेल्या पाच महिन्यांपासून बंद असल्याची माहिती नागरिकांनी दिली आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी संपूर्ण उड्डाणपूल आणि परिसर अंधारात बुडालेला असतो. उड्डाणपुलाच्या सुरुवातीलाच गावाकडे जाणाऱ्या रस्त्याचा अंदाज वाहनचालकांना अंधारामुळे येत नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.

# पोलिसांनी कारवाई न केल्यामुळे अजयचा खून?

## नातेवाईकांचा आरोप, जीव गेल्यानंतर संशयित आरोपी ताब्यात

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील नूतन वसाहत परिसरात २५ वर्षीय अजय विक्रम आढाव याची धारदार शस्त्राने निर्घृण हत्या झाल्याने शहरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या खून प्रकरणी घटना घडण्याच्या अगोदर याबाबतची माहिती पोलीस स्टेशनला व पोलिसांना कळविण्यात आले होते परंतु पोलिसांनी जाणून बुजून दुर्लक्ष केल्यामुळे सदरील खुनाची घटना घडल्याची बोलल्या जात आहे, असा आरोपी नातेवाईकांनी केला आहे. मात्र या हत्येपेक्षा अधिक गंभीर बाब म्हणजे, यापूर्वी झालेल्या हल्ल्याची तक्रार पोलिसांकडे करूनही प्रभावी कारवाई झाली नसल्याचा आरोप मृताच्या नातेवाईकांनी केला आहे.



त्यामुळे वेळीच पोलिसांनी कठोर पावले उचलली उचलली असती, तर आज अजय जिवंत असता, असा संतप्त पोलीस प्रशासनावर नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

गुरुवारी सायंकाळी अंबड चौफुलीजवळील हनुमान मंदिर परिसरात अजय आढाववर अज्ञात हल्लेखोरांनी धारदार शस्त्राने सपासप वार केले. गंभीर जखमी अवस्थेत त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या हल्ल्यात आणखी एक युवक जखमी झाला असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेनंतर जिल्हा सामान्य रुग्णालयात नातेवाईक, मित्रपरिवार आणि नागरिकांनी मोठी गर्दी केली. कुटुंबीयांचा आक्रोश, संतप्त प्रतिक्रिया आणि आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी यामुळे काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. नातेवाईकांच्या आरोपानुसार, तीन-चार दिवसांपूर्वीही अजयवर याच व्यक्तींनी हल्ला केला होता. त्या घटनेची तक्रार पोलिसांकडे देण्यात आली होती. तसेच, आज वाचलास, पण पुढच्या वेळी जिवंत सोडणार नाही, अशी उघड धमकीही देण्यात आली होती. तरीही संबंधितांविरुद्ध पोलीस प्रशासन काहीच कारवाई न केल्यामुळे सदरील घटना घडल्याचे दिसून येत आहे. तसेच प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली नाही. या निष्क्रियतेमुळेच आरोपींचे मनोबल वाढले आणि अखेर अजयचा जीव गेला, असा गंभीर आरोप कुटुंबीयांनी केला आहे. या आरोपांची स्वतंत्रपणे अधिकृत पुष्टी झालेली नाही. या घटनेनंतर जिल्हा सह शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. काही दिवसांपूर्वीपर्यंत अवैध धंद्यांवर धडक कारवायांमुळे निर्माण झालेला पोलिसांचा धाक आता कमी झाल्याची दिसून येत आहे सदरील प्रकरणी जिल्ह्याचे पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी पोलीस प्रशासनावर तत्काळ लक्ष देणे गरजेचे आहे अशी मागणी सामान्य नागरिकाकडून करण्यात येत आहे.

# आरोग्य विभागाची भरती प्रक्रिया रद्द

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या नव्या धोरणानुसार राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (एनयूएचएम), १५ वा वित्त आयोग आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना आदी योजनाअंतर्गत सुरू असलेल्या सर्व भरती प्रक्रिया रद्द करण्यात आल्या आहेत. यापुढे या योजनांसाठी आवश्यक मनुष्यबळाची नियुक्ती थेट भरतीऐवजी बाह्य यंत्रणेमार्फत सेवा कंत्राट (आउटसोर्सिंग) पद्धतीने करण्यात येणार असल्याचे महापालिका प्रशासनाकडून जाहीर करण्यात आले आहे.




महापालिकेने आरोग्य विभागातील नियुक्त्या आता सेवा कंत्राटातून केल्या जाणार असल्याचे जाहीर केले आहे. आयुक्त, शहरी आरोग्य, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांनी ७ ऑगस्ट रोजी जारी केलेल्या पत्रानुसार हा निर्णय लागू करण्यात आला आहे. त्यानुसार नागरी आरोग्य संस्थांमधील मनुष्यबळ ठोक मानधन तत्त्वावर सेवा कंत्राटाद्वारे उपलब्ध करून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या निर्णयानंतर महापालिकेच्या आरोग्य विभागाने यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या संबंधित भरती जाहिराती रद्द समजाव्यात, असे स्पष्ट केले आहे. तसेच या भरती प्रक्रियेतून कोणतीही पुढील नियुक्ती केली जाणार नसल्याचे प्रशासनाने जाहीर केले आहे. त्यामुळे अर्ज दाखल केलेल्या व नियुक्तीच्या प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांना मोठा धक्का बसला आहे. दरम्यान, शासनाच्या नव्या धोरणामुळे आरोग्य विभागातील रिक्त पदांची गरज आता थेट भरतीद्वारे नव्हे, तर सेवा कंत्राटाच्या माध्यमातून पूर्ण केली जाणार आहे. संबंधित योजनांसाठी आवश्यक मनुष्यबळ बाह्य यंत्रणेमार्फत उपलब्ध करून घेण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार असून, त्यानुसार पुढील नियुक्त्या केल्या जाणार असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले.

# बीडच्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा! कर्जमाफीचे ९०.७५ कोटी थेट खात्यात

## बीडच्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा! कर्जमाफीचे ९०.७५ कोटी थेट खात्यात

**बीड । प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफीचा मोठा दिलासा मिळू लागला आहे. जिल्ह्यातील १३ हजार ११० पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यांवर आतापर्यंत तब्बल ९० कोटी ७५ लाख रुपयांचा कर्जमाफीचा निधी थेट जमा करण्यात आला आहे. आधार प्रमाणीकरण पूर्ण झालेल्या पात्र लाभार्थ्यांच्या खात्यावर ही रक्कम ऑनलाइन पद्धतीने वर्ग करण्यात आली आहे.

या योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यासाठी ७११ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे येत्या काळात आणखी पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे.

**राष्ट्रीयकृत बँकांच्या ९,२८३ खात्यांत ७०.०१ कोटी**

आतापर्यंत वितरित करण्यात आलेल्या ९०.७५ कोटी रुपयांपैकी राष्ट्रीयकृत बँकांमधील ९ हजार २८३ शेतकऱ्यांच्या खात्यांवर ७० कोटी १ लाख रुपये जमा करण्यात आले आहेत. तर बीड जिल्हा

### १३ हजार ११० शेतकऱ्यांना लाभ; पहिल्या यादीतील ३२ हजार ३४ जणांचे आधार प्रमाणीकरण बाकी

मध्यवर्ती सहकारी बँकेतील ३ हजार ८२७ शेतकऱ्यांच्या खात्यांवर २० कोटी २४ लाख रुपये वर्ग करण्यात आले आहेत.

**३२ हजार ३४ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक**

योजनेच्या पहिल्या टप्प्यात २५ जुलै रोजी ९६ हजार ५२३ पात्र शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. या यादीतील ३२ हजार ३४ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण अद्याप बाकी आहे.

यादीत नाव असूनही कर्जमाफीची रक्कम खात्यावर जमा झाली नसल्यास संबंधित शेतकऱ्यांनी सर्वप्रथम आपले आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले आहे का, याची खात्री करावी. आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर कर्जमाफीची रक्कम थेट जमा करण्यात येणार आहे.

**कर्जमाफी मिळाली; आता नव्या पीक कर्जाचा मार्गही मोकळा**

कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांसाठी आणखी एक दिलासादायक बाब म्हणजे, चालू खरीप हंगामासाठी त्यांना तातडीने नवीन पीक कर्ज उपलब्ध करून देण्याचे निर्देश शासनाने सर्व बँकांना दिले आहेत. त्यामुळे कर्जमुक्त झालेल्या शेतकऱ्यांना नव्या हंगामातील शेतीसाठी कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

**२ लाख २७ हजार १२८ कर्जखात्यांची माहिती पोर्टलवर**

योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्ह्यातील बँकांनी २ लाख २७ हजार १२८ कर्जखात्यांची माहिती ऑनलाइन पोर्टलवर अपलोड केली आहे. पात्र शेतकऱ्यांना वेळेत लाभ मिळावा, यासाठी प्रशासनाकडून आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यावर भर देण्यात येत आहे.

पहिल्या यादीत नाव असलेल्या आणि अद्याप आधार प्रमाणीकरण न केलेल्या सर्व शेतकऱ्यांनी तातडीने आधार प्रमाणीकरण पूर्ण करून घ्यावे आणि कर्जमुक्ती योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था सतिश तोटावार यांनी केले आहे.

## अन्यथा १५ ऑगस्टला पालकमंत्र्यांना काळे झेंडे! हुले कन्स्ट्रक्शनवर ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्याची मागणी

बीड । प्रतिनिधी

पालवन चौकपालवनदेवराई या सुमारे ५० ते ६० गावांची जीवनवाहिनी असलेल्या महत्त्वाच्या रस्त्याच्या कामातील कथित भ्रष्टाचार, निकृष्ट दर्जाचे बांधकाम, मुदतीचा भंग आणि अपूर्ण कामाची बिले मंजूर करण्याच्या प्रयत्नांविरोधात वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष प्रतिक उर्फ अजय सरवदे यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे सविस्तर तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीत संबंधित कंत्राटदार हुले कन्स्ट्रक्शन, पाटोदा तसेच सार्वजनिक बांधकाम विभागातील संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.



तक्रारीनुसार, २९ मे २०२५ रोजी कार्यारंभ आदेश मिळालेल्या या कामाची मुदत २९ मे २०२६ रोजी संपली असतानाही संपूर्ण वर्षभर काम प्रलंबित ठेवण्यात आले. मुदत संपण्याच्या काही दिवसांपूर्वी केवळ दिखाऊ स्वरूपात काम सुरू करून एका बाजूचे अपूर्ण काम करण्यात आले, तर दुसरी बाजू पूर्णपणे सोडून देण्यात आली. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने डिसेंबर २०२६ पर्यंत बेकायदेशीर मुदतवाढ दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

तक्रारीत रस्त्याच्या कामात मोठ्या प्रमाणावर काळ्या मातीचा वापर, कडेला आवश्यक भराव न टाकणे, मंजूर आराखड्याप्रमाणे काम न करणे, माहिती फलक न लावणे, अपूर्ण कामाची मोजमाप पुस्तिका भरून बिले मंजूर करण्याचा प्रयत्न अशा गंभीर अनियमिततांचा उल्लेख करण्यात आला आहे. यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचा आरोपही करण्यात आला आहे. यापूर्वीही नवगण कॉलेज चौकपंचशील नगरपालवन चौक या रस्त्याचे कथित निकृष्ट दर्जाचे काम याच कंत्राटदाराने केले होते. त्या वेळी संतप्त नागरिकांनी तत्कालीन पालकमंत्र्यांच्या ◀◀ पान ३ वर



**महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक मयत घुले यांच्या कुटुंबाला न्याय मिळावा सर्व आरोपी साठी निवेदन देताना मयत घुले यांच्या आई जय भगवान महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब सारणी सांगवी चे सरपंच संजय केदार एडवोकेट राहुल आगाव समाजसेवक केशव तांदळे व इतर**

## युपीएससी मध्ये पहिल्याच प्रयत्नात यश

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात घवघवीत यश संपादन करणाऱ्या गाढे पिंपळगाव येथील चैतन्य सुभाष राडकर याचे राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी अभिनंदन केले आहे.

चैतन्यचे वडील सुभाष रडकर यांच्याशी फोनवर संपर्क साधून ना. पंकजाताई मुंडे यांनी चैतन्य ला मनापासून शुभेच्छा दिल्या. यासंदर्भात एक ट्विटही त्यांनी केले आहे. माझ्या मतदारसंघातील गाढे पिंपळगाव ता. परळी वैजनाथ जि. बीड येथील शेतकरी





**ना. पंकजाताई मुंडे यांनी केले गाढे पिंपळगावच्या चैतन्य राडकरचे अभिनंदन**

कुटुंबातील विद्यार्थी चैतन्य सुभाष राडकर याने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या () केंद्रीय सशस्त्र पोलीस दलातील () असिस्टंट कमांडंट ◀◀ पान ३ वर

## बीडच्या १ लाख ७७ हजार ३५१ शेतकऱ्यांच्या पीकविम्यासाठी पुन्हा आंदोलनाची हाक; १५ ऑगस्टला पालकमंत्र्यांना देणार निवेदन -भाई थावरे

माजलगाव । प्रतिनिधी

२०२५ च्या खरीप हंगामातील पीकविम्याचा प्रश्न अद्यापही प्रलंबित असल्याने बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना आहे. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यासाठी सरसकट हेक्टरी १७ हजार ५०० रुपये पीकविमा देण्याची मागणी करण्यात आली आहे.



२०२५ च्या खरीप हंगामात बीड जिल्ह्यातील तब्बल १ लाख ७७ हजार ३५१ शेतकऱ्यांनी पीकविमा भरला असून, ९० हजार ४१८ हेक्टर क्षेत्राचा विमा उतरविण्यात आला आहे. या शेतकऱ्यांनी मिळून ५ कोटी २४ लाख ३९ हजार ८२० रुपये विमा हप्ता भरला आहे. मात्र, अपेक्षित नुकसानभरपाई अद्याप शेतकऱ्यांना मिळाली नसल्याचा आरोप शेतकरी संघर्ष समितीने केला आहे.

या पार्श्वभूमीवर शेतकरी संघर्ष समितीचे भाई गंगाभीषण थावरे यांनी महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांना निवेदन देण्याची भूमिका घेतली आहे.

पीकविम्याच्या मागणीसाठी यापूर्वी बीड जिल्ह्यात विविध ठिकाणी मोर्चे, आंदोलन, रास्ता रोको तसेच लोकप्रतिनिधी आणि मंत्र्यांना निवेदने देण्यात आली आहेत. मात्र अद्याप ठोस निर्णय न झाल्याने शेतकरी संघर्ष समितीने पुन्हा आक्रमक भूमिका घेतली आहे. १५ ऑगस्ट रोजी ध्वजारोहणानंतर पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांना पीकविम्याच्या मागणीचे निवेदन देण्यात येणार आहे. बीड जिल्ह्यातील लाखो शेतकऱ्यांच्या या प्रश्नाकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने नुकसानभरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. "१ लाख ७७ हजार ३५१ शेतकऱ्यांनी विमा भरला आहे; आता त्यांच्या हक्काच्या नुकसानभरपाईसाठी सरकारने पुढाकार घ्यावा," अशी भूमिका शेतकरी संघर्ष समितीने घेतली आहे.

## आष्टी पंचायत समितीचे माजी उपसभापती आत्माराम फुंदे यांच्या मातोश्रींचे निधन

आष्टी : प्रतिनिधी

आष्टी पंचायत समितीचे माजी उपसभापती आत्माराम फुंदे तसेच जिल्हा परिषद सदस्य शांतीनाथ फुंदे यांच्या मातोश्री कै. पार्वती केशवराव फुंदे (आक्का) (वय ७८) यांचे आज दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने फुंदे कुटुंबीयांसह नातेवाईक, आप्तेष्ट व परिचितांमध्ये शोककळा पसरली आहे.



कै. पार्वती फुंदे या प्रेमळ, मनमिळाऊ व कुटुंबवत्सल स्वभावाच्या होत्या. त्यांनी आपल्या कुटुंबाला संस्कारांची शिदोरी देत कुटुंबाच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले. त्यांच्या निधनाने फुंदे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

कै. पार्वती फुंदे यांच्या पार्थिवावर उद्या रविवार, दि. ९ ऑगस्ट ◀◀ पान ३ वर

## अकरावी उत्तीर्ण खंडित विद्यार्थ्यांना १२ वीत प्रवेश मिळावा- मुप्टा शिक्षक संघटनेची मागणी

बीड । प्रतिनिधी

२०२४ व त्यापूर्वी इयत्ता ११ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना १२ वी मध्ये प्रवेश मिळावा कुणीही शिक्षणापासून वंचित राहणार अशी मागणी मुप्टा शिक्षक संघटना बीड जिल्हा यांनी शिक्षण उपसंचालक कैलास दातखिळ साहेब विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे केली आहे.



सन २०२४ आणि त्यापूर्वी इयत्ता अकरावी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी ज्यांनी मागील वर्षी ऑफलाइन प्रवेश घेतला होता आणि यावर्षीच्या शैक्षणिक वर्ष २६-२७ साठी प्रवेश घेण्यासाठी इयत्ता बारावी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाइन लॉगिन आयडी देऊन सदरील सर्व विद्यार्थ्यांना इयत्ता बारावी परीक्षा देण्यासाठी ग्राह्य धरण्यात येऊन विद्यालय व महाविद्यालयास आपल्या स्तरावरून आपण सूचना आदेश निर्गमित करावा याविषयीचे निवेदन मुप्टा शिक्षक संघटना बीड जिल्हावतीने जिल्हाध्यक्ष शरदराव मगर, जिल्हासचिव प्रा.शशिकांत जावळे, प्रा. रोहित डोंगरे यांनी सादर केले.

## महानगरांच्या धर्तीवर आष्टी-मुर्शदपूरकरांना सुविधा; युवानेते जयदत्त धस यांच्या हस्ते सेवेला प्रारंभ

### आष्टीत 'क्विक कनेक्ट'चा शुभारंभ; आता एका फोनवर घरपोच मिळणार गरजेच्या वस्तू

आष्टी । प्रतिनिधी

सध्याच्या धावपळीच्या युगात पैसा असूनही वेळेअभावी अनेक छोटी-मोठी कामे रखडतात. दैनंदिन गरजेच्या वस्तू खरेदी करण्यासाठीही नागरिकांना आपला बराच वेळ खर्च करावा लागतो. हीच अडचण लक्षात घेऊन आता आष्टी शहर आणि मुर्शदपूर परिसरातील नागरिकांना महानगरांच्या धर्तीवर घरबसल्या विविध गरजेच्या वस्तू मागविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ग्रीन फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या 'क्विक कनेक्ट' या सेवेमुळे नागरिकांना एका फोनवर आवश्यक वस्तू घरपोच मिळणार आहेत. या सुविधेचा नागरिकांना निश्चितच मोठा फायदा होईल, असा विश्वास युवानेते जयदत्त धस यांनी व्यक्त केला.




आष्टी शहरातील शनिमंदिर येथे शनिवार, दि. ८ रोजी सकाळी ११ वाजता युवानेते जयदत्त धस यांच्या हस्ते 'क्विक कनेक्ट' या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.आजच्या काळात प्रत्येक व्यक्ती आपापल्या कामामध्ये व्यस्त आहे. नोकरी, व्यवसाय, शेती तसेच कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळताना नागरिकांना छोट्या-छोट्या वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारात जाणे अनेकदा शक्य होत नाही. अशा परिस्थितीत घरबसल्या आवश्यक वस्तू उपलब्ध करून देणारी सेवा नागरिकांसाठी उपयुक्त ठरणार आहे. 'क्विक कनेक्ट'च्या माध्यमातून आष्टी शहरासह मुर्शदपूर परिसरातील नागरिकांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन जलद आणि सोयीस्कर सेवा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.यावेळी बोलताना जयदत्त धस म्हणाले की, "लोकांच्या दैनंदिन अडचणी दूर करण्यासाठी अशा प्रकारचे माध्यम अत्यंत महत्त्वाचे आहे. आज प्रत्येकाकडे पैसा असला ◀◀ पान ३ वर

## श्रीकृष्ण विद्यालयाची कबड्डी, रिलेमध्ये विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

**आष्टी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र भूषण, शिक्षण महर्षी तथा शेतकरी नेते मा. आमदार भीमराव धोंडे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त कडा येथे आयोजित करण्यात आलेल्या संस्थांतर्गत तालुकास्तरीय भव्य क्रीडा महोत्सवात मातकुळी येथील श्रीकृष्ण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने दमदार क्रीडा कामगिरी करत विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील उज्ज्वल परंपरेची पुन्हा एकदा प्रचिती दिली.

या क्रीडा महोत्सवात श्रीकृष्ण विद्यालयाच्या १४ वर्षे वयोगटातील मुलांच्या कबड्डी संघाने संस्थास्तरावर द्वितीय क्रमांक, तर १४ वर्षे वयोगटातील मुलांच्या ४०० मीटर रिले संघानेही द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच १७ वर्षे वयोगटातील मुलांच्या कबड्डी संघाने तृतीय क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.



### आष्टी तालुकास्तरीय क्रीडा महोत्सवात तीन संघांचा गौरव

### मातकुळीच्या श्रीकृष्ण विद्यालयाच्या शिरपेचात मानाचे तीन तुरे; खेळाडू व क्रीडा शिक्षकांचे सर्वत्र कौतुक

या शानदार कामगिरीबद्दल विजयी संघातील खेळाडूंना आदरणीय आमदार भीमराव धोंडे साहेब तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक, सन्मानचिन्ह व ट्रॉफी प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि विजयाचा उत्साह ओसंडून वाहत होता.

कबड्डीसारख्या सांघिक खेळात चपळाई, ताकद, संयम, नियोजन आणि संघभावना या गुणांची कसोटी लागते. श्रीकृष्ण विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी या सर्व गुणांचा उत्कृष्ट समन्वय साधत प्रतिस्पर्धी संघांना कडवी झुंज दिली. तर ४०० मीटर रिले स्पर्धेत वेगासोबतच संघातील प्रत्येक खेळाडूने दाखवलेला समन्वय आणि आत्मविश्वास यामुळे संघाने द्वितीय क्रमांक पटकावला. विद्यार्थ्यांच्या या यशामागे क्रीडा शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, नियमित सराव, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांची मेहनत महत्त्वाची ◀◀ पान ३ वर

## उखंडा तलावात बुडून बीडमधील ४५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू

पाटोदा । प्रतिनिधी

मुळचे लिंबागणेश (ता. बीड) येथील रहिवासी व सध्या बीड शहरात स्थायिक असलेले राजेश वामन निर्मळ (वय ४५) यांचा उखंडा तलावात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना आज शनिवार, दि. ८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास घडली.



राजेश निर्मळ हे पत्नी, मेहुणी व तीन मुलांसह उखंडा तलाव परिसरात पर्यटनासाठी आले होते. यावेळी त्यांची मुले तलावाच्या पाण्यात उतरली होती. अचानक मुलांकडून आरडाओरड झाल्याने मुले बुडत असल्याचे समजून त्यांना वाचवण्यासाठी राजेश निर्मळ यांनी पाण्यात उडी घेतली. मात्र तलावातील खोल खड्ड्याचा अंदाज न आल्याने ते पाण्यात बुडाले. दरम्यान, इतरांनी प्रयत्न करून मुलांना सुखरूप बाहेर काढण्यात यश मिळवले. घटनेची माहिती मिळताच पोलिस प्रशासन व अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर तलावात शोधमोहीम सुरू करण्यात आली. अखेर अथक शोधकार्यानंतर प्रशासनाला राजेश वामन निर्मळ यांचा मृतदेह शोधण्यात यश आले. या दुर्दैवी घटनेमुळे निर्मळ कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26